
SBI PEN. ASSN.'S SAMVAD
स्टेट बँक पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल), पुणे यांची गृहपत्रिका
Price ₹ 3/-
संवाद
VOL. - 7
ISSUE - 4
OCTOBER - 2014
ऑक्टोबर २०१४
।। स्वयमेव मृगेंद्रता ।।
मनामनांचा मेळ जुळावा । द्वेषाचा लवलेश नसावा ।।
सादासी प्रतिसाद मिळावा । वाद नको संवाद असावा ।।
दिवाळी विशेषांक

OCTOBER - 2014 SAMVAD

## Annual General Meeting held on 27th August 2014 at Pune - Snap Shots



Shri. P. M. Narkar lighting the auspicious lamp (from left) Shri.D.A.Kulkarni, Treasurer Shri.Sahebrao Desai, Vice-President and Shri.R.N.Lalingkar, Secretary



Shri.N.S.Kulkarni, Ex-President of Mumbai Circle Pensioners' Assn speaking about Late Shri.E.K.Thakur. Others on the dais are Circle Managing Committee members




Shri.Vilas V. Gandhe, Jt. Secretary of the Circle Association speaking on the occasion



Shri.J.S.Vakil from Nagpur, recipient of "Late Shri.L,N,Pabalkar Memorial Gold Medal" being felicitated with 'Scroll of Honour' by Shri.P.M.Narkar



2

# संपादकीय..

प्रिय सभासदमित्रांनो,

'संवाद' चा ऑक्टोबर २०१४ चा हा 'दिवाळी विशेषांक' सादर करतांना आम्हास विशेष आनंद आणि समाधान वाटत आहे. दिवाळी दीपोत्सवाचा अन् दीपवून टाकणारा सण म्हणून आपल्या भारतवर्षात ओळखला जातो. वर्षानुवर्षे सण, उत्सव साजरे होतात. उत्सव हे ऐक्याचे साधक, प्रेमाचे बोधक तर भावनांचे संवर्धक असतात. हे उत्सव प्रत्येकजण आपल्या पद्धतीने साजरा करतो. त्याचा आनंद, अनुभव घेतला जातो. सण तसा उत्सवाचा पण अनेकांच्या उधार-उसनवारीतही साजरा होतो. उसनवारी करताना काही उणे राहू नये हे ही पाहिले जाते. माणूस हा जगत असताना त्याला सण साजरे करण्याचा विशेष आनंद आणि एक वेगळे अप्रूपही असते. आनंद हा गरीब आणि श्रीमंत यांच्यात भेदभाव करत नसतो. मुले, घरातील लहान-थोर मंडळी आपल्या आवडीत गुंतून, आनंदून जातात. यातूनच खरा आनंद मिळतो. प्रत्येक मन वेगळे, त्याच्या मनातले क्षण त्यापेक्षाही वेगळे असतात हे लक्षात घेतले पाहिजे. वयाच्या बदलत्या क्रमानुसार आवडीच्या तसेच आकर्षण असलेल्या जागाही बदलतात, पण ओढ तीच असते. प्रत्येकाच्या मनाला सण-उत्सवाची ओढ लागलेली असते.

खेड्यापाड्यांपासून ते महानगरांपर्यंत एकाचवेळी साजरा होणारा आणि अगदी लहान मुलांपासून - बुजुर्गांपर्यंत सर्वांना सामावून घेणारा हा सण सगळे लोकजीवन चैतन्याने न्हाऊन काढतो. खरे तर दिवाळी हा रोषणाईचा सण, लखलखत्या दिव्यांनी वातावरणातील अंधकाराचे साम्राज्य दूर सारण्याचा, आयुष्य तेजोमय आणि दिव्यातील ज्योतीसमान पवित्र करण्याचा सण.

परंतु काही घरे अशी आहेत की काही दुर्घटनेमुळे त्यांच्या घरी अंधारच असणार आहे. माळीण खेड्यात झालेली जमीनदोस्त घरे, प्राणहानी; आसाम, जम्मू-काश्मीरमध्ये पावसाने घातलेले थैमान, भारत कश्मीर सीमारेषेचे रक्षण करताना झालेल्या गोळीबारात प्राणांची बाजी लावून लढता लढता शहीद झालेल्या आपल्या देशबांधवांचे कुटुंबीय, तसेच आंध्रप्रदेश, ओडिशात 'हुडहुड' चक्रीवादळाने घातलेले थैमान, त्यात बऱ्याच घरांची झालेली पडझड, प्राणहानी... अशा पीडितांप्रती या प्रसंगी आम्ही सहानुभूती प्रकट करतो.

दरवर्षीप्रमाणे यंदाचा दिवाळी विशेषांक विविधांगी, दर्जेदार, आकर्षक, वाचनीय करण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. 'संवाद'चे सर्व वाचक सभासद या विशेषांकाचे स्वागतच करतील अशी आमची मनोमन खात्री आहे.

ही दीपावली व नूतन वर्ष सर्व सभासदांना, त्यांच्या कुटुंबीयांना सुखाचे, समृद्धीचे, समाधानाचे व आरोग्यदायक जावो अशी आम्ही परमेश्वरचरणी प्रार्थना करतो.

*प्रभाकर गुपचुप (पुणे)*

मो. ९८८१५७९४९९

Arcil

**Engagement opportunities with Arcil for Ex-Bank Officers**

Arcil, India's premier Asset Reconstruction Company, invites ex-Bank officers for short term engagement on contractual basis to extract financial data from physical files and documents.

**Brief profile:**

- Basic knowledge of Banking credit is essential
- Knowledge of MS-Excel will be an added advantage
- Age preferably below 65 Years
- Job location ITC Park, CBD Belapur Station, Navi Mumbai.
- Candidate should able to join at a short notice

Interested candidates may email their résumé along with a covering letter to career@arms.net.in or contact HR department on 022-6156 3863/60

## पावसाळा

नेमेचि येतो मग पावसाळा
असा कसा तो खुळा?
हल्ली कुणी जागत नाही शब्दाला
पाळत नाही ठरल्या वेळा

पण या वर्षी मात्र तो आला
सात जूनच्या आधी सात 'मे'ला
आलो आलो म्हणून गडगडला
दोन दिवसांत निघून गेला

झाले 'होत्याचे नव्हते' दोन दिवसांत
झाडे झुडुपे पडली सर्वांच्या परसात
या खुळ्या पावसाने आकाशात वीज चमकवली आणि सर्वांच्याच
घरातील गायबच हो झाली

'येरे येरे' म्हणता येतो
खोट्या पैशासाठी धावत येतो
मोठा मोठा होतो; आणि
साऱ्यांनाच धुऊन काढतो

असा कसा तो खुळा
नेमेचि येतो मग पावसाळा

**६०/१४ श्रीमती गिरिजा पागनीस (१९३०५४४६३७)**

## Medical Check-up Camp by S.B.I.Naupada (Thane) Branch

The above Medical Check-up Camp which was to be organized on 6th October 2014 at our Naupada (Thane) Branch could not be held because of a holiday on that day. We apologise to the members for the inconvenience caused to them. However, it has now been decided by our **Naupada (Thane) Branch to organize the Medical Camp on Wednesday the 12th November 2014.** The details are as under.

### Free Medical Check-up Camp

**with support from the Fortis Hospital, Mulund (Mumbai) & our Mumbai Zonal Sub-Centre** to create health awareness amongst the senior citizens. The Free Health Check-up Camp has been **arranged at SBI Naupada Branch on 12th November 2014 from 3.30 pm onwards.** The Medical Check-up will be available to all the State Bank Pensioners also.

The following Tests will be done during the Camp.

1) Blood Pressure
2) Random Blood Sugar
3) Doctor Consultation
4) ECG (if advised by doctor)
5) Body Mass Index (BMI)

All the Bank's pensioners are requested to avail the facility.

*- Secretary, Thane Unit*

**नोव्हेंबर महिन्यात लाइफ सर्टिफिकेट बँकेत जाऊन देण्याचे लक्षात ठेवा**

# e-Circular

**State Bank of India**
**Corporate Centre - Mumbai**

P&HRD
Sl.No.: 179/2011 - 12
Circular No. : CDO/P&HRD-PPFG/29/2011-12
Friday, June 03, 2011
13 Jyestha 1933 (S)

All LHOs/Branches/Offices of
State Bank of India

Madam / Dear Sir,

**IBI/SBI/SBS/SBIN EMPLOYEES' PENSION SCHEMES**
**IBI/SBI/SBS/SBIN FAMILY PENSION SCHEMES**
**SUBMISSION OF LIFE CERTIFICATE BY**
**PENSIONERS/FAMILY PENSIONERS**

At present there are no laid down instructions regarding the periodicity of submission of the Life Certificate by IBI/SBI/SBS/SBIN Pensioners and Family Pensioners. As a result of which a large number of IBI/SBI.SBS/SBIN Pensioners and family pensioners are not regularly submitting their life certificates which may lead to wrong pension payments and also result in recovery related issues at a later date.

2. The matter has been examined at Corporate Centre and it has been decided as under :

   i. To make it mandatory for all IBI/SBI/SBS/SBIN Pensioners and Family Pensioners to furnish life certificate in the month of November each year on the prescribed format, failing which pension will be stopped two months thereafter i.e. from the month of January.

   ii Life certificate in the physical form may be submitted in the prescribed format by the pensioner / family pensioner not necessarily to the home branch where his / her pension account is maintained but to any branch. The acknowledgement of having received the Life Certificate will be issued to the pensioner / family pensioner by the Branch where the Life Certificate is submitted. After receiving the Life Certificate the branch (Home / Non Home) will verify the signature / thumb impression from CBS and update the same in the related HRMS site. Life Certificate can be updated in the HRMS site by any officer of the branch.

   iii. When Life Certificate is submitted at a Non Home Branch, after updating the record in HRMS, the branch shall forward the original Life Certificate to the Home Branch and retain a copy of the same for their record.

Please note to bring the contents of this circular to the notice of all concerned.

Yours faithfully,

for Dy. Managing Director & Corporate Development Officer

Enclosure : Specimen of Life Certificate for pensioner ( Annexure on the next page)

ANNEXURE

## IBI/SBI/SBS/SBIN PENSION LIFE CERTIFICATE

Certified that Shri / Smt ..........................................................................a pensioner of the Bank

appeared before me today and signed / affixed his / her L.T.I. below in my presence.

________________ ________________

Signature / L.T.I.

Date ...........................

Branch Manager /
Gazetted Officer
(Office seal)

Name of the Pensioner : ________________________

P.F.Index Number : ________________________

Pension A/c No. : ________________________

Name and Code of the
Pension paying Branch : ________________________

-----------------------------------------------------------------

**ACKNOWLEDGEMENT**

(to be given to the applicant by the Branch receiving the Life Certificate)

Received from Shri/Smt.____________________________________________
his / her Life Certificate on ______________

Date ________________

Branch ______________

Signature of the officer
receiving Life Certificate

Seal of the Branch

-----------------------------------------------------------------

(The following clarification is not a part of the specimen of Life Certificate but given for the information of members who happen to be in foreign countries during November)

**Clarification issued by our Federation vide its Circular Letter No.21/2012 dt.17-09-2012**

The **pensioners who are in foreign countries during November** may furnish their life certificate in the month of November to any Branch of State Bank of India **or** any other Indian Public Sector Bank located in that country **or** arrange for obtaining their life certificate **attested from an authorised official of the Embassy / High Commission of India or Counsel of India**. After obtaining the Life Certificate, the pensioner (himself) should forward the attested copy of the Life Certify to their Pension-paying Branch.

***- Secretary***

# Japa Yoga for Peace of Mind

Repeated utterance of say, Aum or Om, or a mantra i.e. sacred utterance of words for contemplation & meditation are useful to remain with positive attitude & happiness. Soham i.e. sahaaham, means 'I am He'. In other words, I am not the body but soul or God..When we chant this mind will be free from other thoughts. Preferably, this should be learnt from a Guru, not ordinary teacher but a God realised person.

## Holi Sound of Cosmic Vibrations

Aum or Om manifests unknown aspects of God. Amen is the affirmation found in Hibrew Bible and the New Testament. Amen is used for concluding word for hymns. Koranic corresponding word is Amin. God manifests in creation as cosmic vibration. Thus we find that the word Aum is used as sacred sound with some variations in all the religions. Aum are manifest and un-manifest aspects of God.

As ParamahansaYoganada has stated, all human beings are born of the creative vibration of Aum. But, having identified with finitely limited human body, the soul feels confined to physical body and the individual concerned can't experience creative cosmic vibration of Aum. By a Guru-given technique of meditation taught to the students of Self Realisation Fellowship (established by Yoganandaji) the sacred vibration can be heard in meditation. Initiation into the teachings of Self Realisation Fellowship known in our country as Yogoda Satsanga Society of India loosens the hold of bad habits and wrong desires. Finally, after a long deep practice, the person concerned is blessed by the contact with God.

## Different Mantras

Om Namo Bhagavate Vasudevaya, Om Namah Shivaya, Shri Ram Jayram Jayjay Ram etc are some mantras. For peace, the following mantra is chanted individually or collectively:-

Om, sarvetra sukhinh santu,
Sarve santu niraamayaah,
Sarve bhadrani pashyantu.
Ma kaschitdukkhamapnuyat.
Om, Shantih, Shantih, Shantih.

May all be happy, May all be free from disabilities, May all see the good, Let nobody be in misery. Om, Peace, Peace, Peace. The following mantra is chanted by devotees of Gurus :-

Gurur Brahma, Gurur Vishnu,
Gurur Devo Maheshwarah
Guru Saakshat Para Brahma
Tasmai Shri Gurave Namah

The Guru is Brahma, Vishnu and Shiva. He is in reality creator of all knowledge. I salute to such a Guru.

Gayatri Mantra

Om Bhurbhuvahsvah I Om Tatsaviturvarenyam I
Bhargodevasyadhimahi I Om dhiyoyo nah Prachodayat II

Gayatri Mantra intuitively occurred to Brahmarshi Vishvamitra, born in princely family of kshatriya, after arduous penance. Though Vishwamitra had granted right to chant it for salvation, to all human beings, it was withheld from ladies & non-brahmins. These restrictions have gone now. Today it is chanted & sung around the world with reverence and love. It says, 'May the divine light of the Supreme Being illuminate our intellect to lead us along the path of righteousness'. The Mantra has been in

existence since about 2,500 to 3,500 years. The restrictions to chant are not there in the world. I would say, it should be chanted with clean mind.

Swami Vivekananda described the meaning in simple words as "We meditate on the glory of that Being who has produced this universe; may He enlighten our minds" The Mantra will protect you from harm, make your intellect shine, improve your power of speech and dispel darkness of ignorance. The Mantra should be chanted with clean mind and knowing the meaning. In my view, devotion in chanting with unbiased clean mind and understanding the meaning is important. It is the most potent mantra. Another important mantra is Mahamtrityunjaya mantra.

**Japa & Affirmations**

Repeating with devotion any name, Aum mantras etc is japa. It could be in the form of murmuring, chanting etc. One can have japa mala of bids & count the chanting one by one. This adds to the benefit of pressing acupressure points of thumb & index finger. By deep practise of japa one can have constant awareness, as if japa is made. This is ajapa-japa.

Found 35 affirmations in Google. "I abandon my old habits my old habits & take up new positive ones", "Every thing happening now is happening for my ultimate good" are two of them. Constant repetition of such affirmations changes thinking pattern to positive ways. This is the same as what Yoganandaji advocates as stated in para 3 above. Affirmations is a regular practise of his devotees.

**Learn from Guru**

It would be observed that all saints & sages had their own Guru. When you learn from a Guru, you get a divine benefit. But one need not wait to find Guru to commence spiritual learning. One can imagine any God or saint as a Guru and commence devotion. At the right time Guru will find you as a disciple. Guru's grace is very important.

**Conclusion**

Japa and affirmations play an important role in spiritual progress and consequent, peace, happiness & bliss. Learning meditation technique from a Guru is essential.

In presenting this article for the benefit of fellow pensioners, I have drawn on teachings of Paramahansa Yogananda,Tattvaloka magazine & access to internet.

- *S.V.Naik,* Andheri East, Mumbai 400069.
Cell # 09821127616

**डोंबिवली-कल्याण युनिट - सभासदांचा मेळावा**

स्टेट बँक निवृत्त कर्मचाऱ्यांचा वार्षिक मेळावा शुक्रवार दि.२१ नोव्हेंबर २०१४ रोजी संध्याकाळी ४.३० वाजता आपल्या बँकेच्या टिळकनगर, डोंबिवली (पूर्व) शाखेत आयोजित केला आहे. सभेस आपल्या सर्कल असोसिएशनचे तसेच मुंबई सब्-सेंटरचे अध्यक्ष श्री.एस.बी.गोखले उपस्थित राहणार आहेत. तरी डोंबिवली ते कल्याण-बदलापूर-टिटवाळा या भागातील सर्व सभासदांनी उपस्थित रहावे ही विनंती.

**सुभाष आगरकर**
ऑर्गनाइझिंग सेक्रेटरी, डोंबिवली-कल्याण युनिट

**Writ Petition No.1875 of 2013**

It is learned from our Federation that the W.P.No.1875 of 2013 filed in Delhi High Court could not be heard on 14th October 2014. The case has now been posted for next hearing on 27th November 2014.

- Secretary

**Please furnish the Life Certificate during November 2014**

## प्रतिसाद

'संवाद' सप्टेंबर २०१४ चा अंक मिळाला. 'संवाद' मासिकाची अगदी व्यवस्थित आखणी करणारे, संपादक मंडळ, तसेच श्री. लळींगकर सेक्रेटरी, त्या महिन्यात १० ते १२ तारखेपर्यंत सर्व अभिनंदनीयपर माहितीची पत्रे, लेख, बँकेतील चालू घटना, ह्यांची माहिती जागेच्या उपलब्धतेनुसार छापतात त्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार. 'संवाद'मधील बरेच लेख संग्रही ठेवण्यासारखे आहेत.

सप्टेंबर मधील संपादकीय दिवंगत श्री. एन. एस. कुलकर्णी यांच्यावर श्री. क्रांतिसेन आठवले यांनी अल्पवेळात श्रद्धांजलीपर लिहिलेला लेख व संपादकीय चांगले आहे.

श्री. बी. जी. दांडेकर साहेब यांचा 'THREE DECADES' चा फेडरेशनवरील लेख माहितीपूर्ण आहे. Federation ने त्यावेळी मॅनेजमेंटशी कसा सामना केला, ह्याची माहिती परिपूर्ण आहे. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

Centralised Staff Pension Processing Cell व 'संवाद' लेख स्पर्धेतील विजेते श्री. अरुण काकडे व सौ. संध्या परदेशी यांचे लेख उत्तम व वाचनीय आहेत.

'संवाद' नेहमीच वाचनीय असतो. त्याबद्दल संपादक मंडळाचे पुन्हा एकदा अभिनंदन.

**डी. ए. कुलकर्णी, पुणे**

## चांदणी, यू टू?

प्राध्यापक महाशय क्लासमध्ये - स्वच्छता-व्यक्तिमत्त्व नीटनेटकेपणा- या विषयावर लेक्चर देत होते. मंगळागौरीच्या जागरणामुळे चांदणीचे लेक्चरमधे मुळीच लक्ष नव्हते. झोप आवरत नव्हती - तरीही ती आपण नॉर्मल असल्याचं मधून मधून नाटक करीत होती. लेक्चर देता देता प्रा. महाशयांनी मुलांना प्रश्न केला अन हात वर करण्यास सांगितले - बहुतेक मुलांनी हात वर केले-अन् एकमेकांकडे बघतांना सर्व मुले खुदखुदा हसत होती- चांदणीला प्रश्न काय आहे ते काही कळलं नव्हतं-तरीही - उगीच आपण मागे नको म्हणून हात वर केला होता. चांदणीच्या शेजारी बसलेल्या तिच्या मैत्रिणीने झटकन चांदणीचा हात खाली ओढून घेत म्हणाली ''बावळट! मूर्ख आहेस का तू? हात कशाला वर करतेस? - सर मुलांना सांगत होते की तुमच्यापैकी कोण कोण रोज चकाचक दाढी करतं - त्यांनी हात वर करावा.''

**मधू रानडे, नाशिक**


*SPECIAL FESTIVAL OFFER,*

**FOR ALL YOUR INTERNATIONAL COURIER NEEDS**

***Universal Courier***

*We bring the universe at your doorstep*

*SINCE 1992*

*IATA CERTIFIED*

***An Organization run by SBI pensioners***

***Mr. J. N. Sethia & Mr. P. W. Kamerkar's next generation***

**Offering wide range of services for worldwide such as Express Courier, Airfreight Door to Door as well as Airport to Airport, Import/ Export custom clearance & free pick-ups from anywhere in Mumbai. Expertise in dealing with Foodstuff & personal effect shipments for worldwide.**

*Specialize for: UK, Dubai, USA, CANADA, and AUSTRALIA & AFRICA.*

***Contact: Mr.Biren Sethia - 9820338233, Mr.Mahesh Kamerkar - 9820316152, Pushpendra Tiwari -9870198118/9321026630 & Kajal - 8879140670***

**Landline: 022 - 26821072/74**

E-mail: sales@ucglobal.com & mahesh.k@ucglobal.com

Website: www.ucglobal.com

***HO:*** *1 & 2 Skylark, Next to Kamgar Kalyan Bhawan, Near BMC office, Azad Road, Andheri East, Mumbai – 400069*

लघुकथा



# 'ती' का 'ही'?



अशोकने ई-मेल संपवलेआणि त्याची पत्नी आशाकडे पाहत म्हणाला, ''हुश्श्य, झाले. सगळ्या स्थळांना अभिजितची माहिती कळवून झाली, मुलाचे लग्न एवढे अवघड असेल असे वाटले नव्हते.'' आपला मुलगा एवढा मोठा पदवीधर, अमेरिकेत भरपूर पगाराची नोकरी. मुलींची रांग लागेल असे वाटत होते, पण होत आहे उलटेच

आशा-त्याची पत्नी काही दिवसांपूर्वी छोटासा अपघात झाला, कमरेला मार लागला. त्यामुळे एका पायातील शक्ती गेली. अपंगत्व आले. घरकाम व इतर कामे तेवढी होत नाहीत. सगळे अशोकला बघावे लागते. काही वर्षांपूर्वी गोल्डन शेकहँडस्कीमचे वेळी त्याने बँकेतून स्वेच्छानिवृत्ती घेतली. आता दोघेच राहतात. एकुलता एक मुलगा इंजिनियर होऊन अमेरिकेत नोकरीला गेला. लहान वयातच त्याने फार मोठी झेप घेतली. सध्या त्याला दहा हजार डॉलर महिना पगार मिळतो. तो म्हणतो आईला घेऊन इकडे या, आपण येथे उपचार करू. पण आशा तयार नव्हती.

''अहो आज काळ बदलला आहे, मुलींच्या अपेक्षा वाढल्या आहेत. त्यांनापण करियर करायचे असते आणि आपल्या अभिजितला योग्य अशी मुलगी हवी असेल तर हे सर्व करायलाच हवे.'' आशा.

''एवढे मात्र खरे हां! आज मुलींच्या अपेक्षा वाढल्या आहेत, मी माझ्या मित्रांचे एकेक किस्से ऐकतो. चांगली मुलगी मिळणे अवघड झाले आहे. प्रत्येकीला राजाराणीचा संसार हवा आहे. त्यात आई-वडिलांची लुडबुड नको. आपल्या वेळी असे नव्हते, तू नोकरी करून घर सांभाळून माझ्या तिन्ही बहिणींची लग्ने स्वत:च्या बहिणीसारखी करून दिलीस. आई-वडिलांकडे लक्ष दिलेस.'' अशोक.

''आता काळ वेगळा आहे, आपण अपेक्षा ठेवण्यात अर्थ नाही. त्यांचे ते सुखात राहिले तरी बस् झाले. आपला अभिजित परत भारतात येतो का तेथेच सेट होतो देव जाणे.'' आशा.

''हे देवावर नाही, त्याच्या येणाऱ्या बायकोवर अवलंबून असेल. ती कशी असेल हे महत्त्वाचे आहे.''अशोक.

अशोकने नोकरीत चांगले पद मिळवले. आपल्या जबाबदाऱ्या पार पाडल्या. आशाने त्याला वेळोवेळी साथ दिली पण आता ती अपंग झाली आणि हा पण मनाने अपंग झाला. एकुलता एक मुलगा. आता येणारी सून मुलीसारखी राहिली तर आपले आयुष्य आनंदाचे जाईल. नाही तरऽऽ अशोकने मनातला विचार झटकला.

बऱ्याच स्थळांशी फोनवर बोलणे, पत्रव्यवहार होऊन योग्य अशा दोन मुली निवडल्या. त्यांच्याशी बोलणे झाले. आधी आपण दोन्ही मुली पाहाव्यात, त्यांच्याशी बोलावे आणि मग अभिजितला सांगावे असे ठरले.

पहिली मुलगी अस्मिता शिंगणेकर, शिंगण तालुक्यात शिकलेली. नंतर इंजिनियर होऊन अमेरिकेतच नोकरी करतेय. आई-वडील दोघेही प्राध्यापक. त्यांनाही एकुलती एक मुलगी. मुलगी हुशार, दिसायला पण स्मार्ट. फोटोवरून तर पसंत होती. अशोक आणि आशा त्यांच्या घरी गेले. प्रारंभिक बोलणे झाल्यावर अस्मिता बाहेर आली. अंगावर जीन पँट, ढगळा टी-शर्ट, तो ड्रेस पाहून आशा चमकलीच.

''होय, मी अस्मिता. वास्तविक मला पहायला तुम्ही आलात, त्यामुळे मी पारंपारिक वेषात असायला हवे हो. बट आय डोंट लाईक टू फॉलो ओल्ड ट्रॅडिशन्स. आपण बदलले पाहिजे.'' अस्मिता म्हणाली.

तिचे एवढे स्पष्ट बोलणे ऐकून अशोक, आशा आश्चर्यचकित झाले. तालुक्याच्या ठिकाणी वाढलेली मुलगी जुन्या वळणाची असेल असे वाटत होते. पण हे वळण काही वेगळेच आहे.

''काय आहे, दोन वर्षे अमेरिकेत राहिली आहे. त्यामुळे तेथील वातावरणाचा परिणाम नाही म्हटले तरी होतोच.'' तिची आई म्हणाली. वडील बिचारे गप्प बसले होते.

''हे पहा अंकल, मी करियर महत्त्वाचे मानणारी मुलगी आहे. तुमच्या मुलाची माहिती मी वाचली, त्याच्याशी चॅटही केले, तो हुशार आहे. त्याचे फ्युचर ब्राईट आहे, मला तो पार्टनर म्हणून पसंत आहे.'' अस्मिता.

'काय मुलगी आहे, आम्ही काही विचारायच्या आत या मुलीने आपला निर्णय सांगून पण टाकला,' आशा मनात म्हणाली.

''हे पाहा आँटी, मला नाही त्या गोष्टीत वेळ घालवायला आवडत नाही. माणसाने प्रॅक्टिकल असावे. माझे निर्णय मी स्वत: घेते. त्यात कोणी ढवळाढवळ केलेली मला आवडत नाही. तुम्हाला काही विचारायचे असेल तर विचारा.'' अस्मिता.

एवढ्या स्पष्ट बोलणाऱ्या मुलीला काय विचारायचे हा प्रश्न आशाला पडला; तरी पण तिने विचारले, ''तुझ्या करियर करण्याच्या ध्येयामुळे तुझे संसाराकडे दुर्लक्ष होणार नाही का? घर पाहणे, स्वयंपाकपाणी, मुलांचे संगोपन या गोष्टींकडे तुला लक्ष द्यायला किती वेळ मिळणार?''

''आँटी, तुम्ही नोकरी करत होता असे मला समजले. तरी तुम्ही टिपीकल हाऊसवाईफचा प्रश्न विचारला, याचे मला आश्चर्य वाटते. हे पाहा आयुष्यात पैसा महत्त्वाचा. पैसा असला की सगळं होतं. मी घर सांभाळायला, स्वयंपाकाला सर्व्हंट ठेवू शकते. आता

मुलांच्या बाबतीत म्हणाल तर पाच वर्षे तरी मी मूल होऊ देणार नाही. कारण माझी प्रेग्नन्सी माझ्या करियरच्या आड येऊ शकते. अन् समजा पुढे मूल झाले नाही तर आम्ही ॲडॉप्ट करू शकतो आणि ते सांभाळायला सर्व्हंट ठेवू शकतो.'' अस्मिता. तिचे हे उत्तर ऐकून अशोक आणि आशा चाटच पडले. त्यांना काय बोलावे सुचेना. ते गप्पच बसले. नंतर चहापाणी आले.

''बरे, निघू या आता.'' अशोक अस्मिताच्या वडिलांकडे पाहत म्हणाले, ''योगायोगाच्या गोष्टी आहेत, मी मुलाशी बोलून तुम्हाला कळवतो.''

''अंकल, योगायोग कधीच नसतो. आपण योगा आणावा लागतो, मला पुढच्या आठवड्यात अमेरिकेला जायचे आहे. त्याच्या आत मला निर्णय घ्यायचाच. तुमचा मुलगा कर्तुत्ववान आहे. आम्ही एकमेकांना योग्य आहोत. अमेरिकेत वास्तव्य करू शकतो. मोठा बंगला, मोठी गाडी कंपनीमध्ये ॲप्रीशेअशन सगळे काही मिळू शकते.'' अस्मिता म्हणाली. तिला अभिजितचे स्थळ सोडायचे नव्हते. तिचा करारीपणा अशोकला आवडला.

''अगं पण, त्याने तिकडे वास्तव्य केले तर आम्ही कोणाकडे जायचे?'' आशा.

''आंटी, तुम्ही पण तिकडे या ना. तुमच्या पायाच्या आजारावर तेथे चांगला उपचार होईल. तेथे हॉस्पिटलमध्ये चांगले लक्ष देतात. घरचे लोक लागतच नाहीत.'' अस्मिता म्हणाली. अजून पुढे जास्त चर्चा नको म्हणून अशोक पटकन उठला. आशाला उठवले, तिचा हात धरून हळूहळू बाहेर पडले.

''बरे आहे, येतो आम्ही.'' आशा. अस्मिताकडे पाहून म्हणाली, ''पोरी प्रत्येक स्त्रीला लहानपणी पित्याचा हात, तरुणपणी पतीचा आणि म्हातारपणी मुलाचा हात लागत असतो. या आधाराशिवाय स्त्री अपुरी आहे.''

घरी आल्यावर दोघांनी बरीच चर्चा केली. ''मुलगी चांगली आहे. कर्तुत्ववान आहे, मला तर आवडली.'' अशोक.

''आता दुसरी कधी बघायची आहे?'' आशाने विचारले.

''उद्याच जायचे आहे.'' अशोक.

सुस्मिता कारेकर. पुण्यामध्ये वाढलेली, शिकलेली. नुकतीच इंजिनियर झालेली. फोटोपेक्षा प्रत्यक्षात जास्त छान वाटत होती. आई-वडील दोघेही प्राध्यापक. एक मुलगी व एक मुलगा डॉक्टर, लंडनमध्ये राहतो. आता मुलगी इंजिनियर झालेली. अभिजितबरोबर तिचे पण चॅट झाले होते. अलिकडे चॅट प्रकार आपल्याला चॅट पाडतो. सारे काही चॅटमधूनच घडते.

''मुली, तू एवढी इंजिनियर झालीस. मग जॉब का करीत नाहीस?'' अशोकने विचारले. मुलगी काही बोलायच्या आत तिची आई म्हणाली,

''अहो, तिला दोन-तीन चांगले जॉब आले होते. पण आम्ही म्हणालो, आता जॉब नको. आधी लग्नाचे बघू. त्या मंडळींचा विचार घेऊ, तू नोकरी करून पैसे मिळवावेस की घर सांभाळावेस हे त्यांच्यावर अवलंबून राहील.'' मुलीची आई म्हणाली.

''अहो पण तिने एवढे शिक्षण घेतले, त्याचा उपयोग करून घ्यायला नको का? काही करियरचा विचार करायला नको का?'' आशा.

''मुलीने शिक्षण घेतले की नोकरी केलीच पाहिजे असा काही नियम आहे का? मुलीने तिच्या शिक्षणाचा उपयोग तिच्या मुलांना योग्य शिक्षण देण्यासाठी केला पाहिजे, करियरच्या आणि पैसे मिळवण्याच्या नादात बाईचे घराकडे दुर्लक्ष होते.'' सुस्मिताची आई.

''अहो, तुम्ही पण नोकरी करत आहात ना! मग मुलीला का अडवता?'' आशाने पटकन विचारले. पण लगेच तिला वाटले, आपण असे विचारायला नको होते.

''मी जरी शिकलेली होते तरी नोकरी करत नव्हते. दोन्ही मुले शाळेत जाऊ लागल्यावर, त्यांना त्यांचे समजू लागल्यावर मग मी नोकरीसाठी प्रयत्न केला आणि प्राध्यापक म्हणून नोकरी मिळाली आणि माझ्या मुलीचे तेच विचार आहेत. तिला संसाराची जास्त आवड आहे.'' सुस्मिताची आई.

''ही फारच छान गोष्ट आहे. नाहीतर आजकालच्या मुली संसाराला दुय्यम समजतात. नोकरी करणे, पैसा मिळवणे, गाडी, बंगला, कपडालत्ता, दागदागिने सारी हौस पूर्ण करणे याच नादात असतात.'' अशोक.

''तुला आमचा अभिजित कसा वाटला?''आशाने.

''ते हुशार आहेत. त्यांची स्वप्ने आहेत पण ती पूर्ण करण्याची त्यांची धडाडी आहे. कर्तुत्ववान आहेत.'' सुस्मिता.

''अमेरिकेत नोकरी करावी, करियर करावे, नवऱ्याप्रमाणे आपणही नाव मिळवावे असे तुला वाटत नाही?'' आशा.

''काकू, मी घर सांभाळण्याला प्राधान्य देते. दोघांनीही दिवसभर नोकरी करायची, काय असेल ते खायचे आणि झोपायचे आणि उद्या पुन्हा तेच चक्र फिरवायचे. मग जर आम्हाला एकमेकांशी बोलायला पण वेळच नसेल तर मिळवलेल्या पैशाचा, अधिकाराचा, कंपनीच्या उत्तम कामाच्या प्रमाणपत्राचा उपयोग काय? आपण पैशासाठी जगणार आहोत की स्वत:साठी जगणार आहोत? पैसा मिळाला म्हणजे सगळे मिळाले असे नाही.'' सुस्मिता.

सुस्मिताचे हे बोलणे ऐकून अशोक आणि आशा दोघांनाही आश्चर्य वाटले. तालुक्याच्या ठिकाणी जन्माला येऊन पैसा मिळाला म्हणजे सगळे मिळते असे म्हणणारी ती अस्मिता आणि पुण्यासारख्या शहरात मोठी झालेली, पैशाने किती चैन करता येते हे दररोज पाहणारी पण तरीही पैसा म्हणजे सर्वस्व नव्हे असे म्हणणारी ही सुस्मिता दोघीही तेवढ्याच शिकलेल्या पण विचारात किती फरक!

नंतर थोडा वेळ सर्वांच्या गप्पा झाल्या.

''ठीक आहे. आता आम्ही निघतो. मी अभिजितबरोबर बोलून तुम्हाला निरोप देतो.'' अशोक.

सुस्मिताच्या आईने आशाच्या आजाराविषयी पूर्ण चौकशी केली. सुस्मितासुद्धा बरेच विचारत होती.

''तुला अमेरिकेत रहायला आवडेल की आमच्याबरोबर एकत्र, भारतात रहायला आवडेल?'' आशा.

''माझ्या होणाऱ्या पतीचा आणि घरच्यांचा विचार घेऊन जेथे सर्व जण एकत्र राहू शकू तेथे राहणे मला आवडेल.'' सुस्मिता.

बोलता बोलता अशोकने सांगितले की पुढे त्याचे मोतीबिंदूचे ऑपरेशन करायचे आहे.

''बघा ना मी ही अशी अपंग, त्यांचे ऑपरेशन आणि मी काही करू शकत नाही, मला फार वाईट वाटते.'' आशा.

''अग मोतीबिंदू ऑपरेशन म्हणजे अर्ध्या तासाचे काम. सकाळी सातला जाईन, नऊ वाजता घरी परत येईन. डॉक्टरांनी तसे सांगितले आहे.'' अशोक.

''चला, आता निघू या.'' आशा.

तेवढ्यात सुस्मिताने तिच्या आई-वडिलांना बोलावून आतल्या खोलीत नेले. ''काका, दोन मिनिट थांबा, मी आलेच,'' असे म्हणून सगळे आत गेले.

हॉलमध्ये अशोक आणि आशा दोघेच होते. त्यांना कळेना, अचानक हे सगळे आत का गेले. पाच मिनिटांनी ते तिघे हॉलमध्ये आले.

''बाबा, तुम्ही काकांना सांगा ना!'' सुस्मिता.

''हे पाहा, हा निर्णय तुझा आहे. माझी त्याला संमती आहे. मी तुझ्या इच्छेविरुद्ध नाही. तेव्हा तुझा निर्णय तूच सांगावास.'' सुस्मिताचे बाबा तिला म्हणाले.

''नाही, नाही, एवढी घाई नाही. तुझा निर्णय तू आम्हाला नंतर सांग. आम्ही आधी अभिजितबरोबर बोलतो.'' अशोक.

''काका, तो निर्णय नाही, मी तुमची सून होणार की नाही या योगायोगाच्या गोष्टी आहेत.'' सुस्मिता.

''तू योगायोग मानतेस?'' मध्येच आशाने विचारले.

''हो, काही गोष्टी घडण्यासाठी योगायोग असतोच पण प्रत्येक गोष्टीसाठी नाही. काही गोष्टींचा योग आपण आणावा लागतो. जसा मी आता आणणार आहे.'' सुस्मिता.

''म्हणजे? मी नाही समजले!'' आशा.

''काकू, काकांचे ऑपरेशन आहे त्या दिवशी काकांना दवाखान्यात नेणे, ऑपरेशन होईपर्यंत थांबणे आणि दिवसभर त्यांच्याकडे लक्ष देणे, दुसऱ्या दिवशी डॉक्टरांकडे नेणे आणि दिवसभर डोळ्यात औषध घालणे, एवढे काम करण्याची संधी तुम्ही मला द्यावी. मला तसे करण्याची परवानगी माझ्या आईवडिलांनी दिली आहे. म्हणूनच मी त्यांना मघाशी आत घेऊन गेले होते.'' सुस्मिता.

तिचे हे बोलणे ऐकून आशाच्या डोळ्यात पाणी आले. तिने सुस्मिताला जवळ घेतले. तिच्या कपाळाचे चुंबन घेतले.

''कारेकर, तुम्ही भाग्यवान आहात, अशी मुलगी तुम्हाला आहे.'' अशोक.

दोघेही तेथून बाहेर पडले. दुसऱ्या दिवशी अभिजितला दोन्ही मुलींचा तपशीलवार रिपोर्ट दिला. अभिजितने निर्णय त्यांच्यावर सोडला.

''मग काय म्हणताय सासूबाई, कोणती सून हवी आहे?'' अशोक.

''तुम्हाला कोणती हवी आहे?'' आशा.

''हे पहा दोघीही आपापल्या परीने बरोबर आहेत. अस्मिताचे म्हणणे काही चूक नाही. आपल्या आयुष्यातसुद्धा पैशामुळे कितीतरी गोष्टी अडल्या.'' अशोक.

''पण आपल्याला तर निवड एकीचीच करायची आहे.''

''करियर बघून घर बघणारी अस्मिता की घर बघून करीयरचा विचार करणारी सुस्मिता. पैसा असला की मोठ्या हॉस्पिटलमध्ये उत्तम उपचार घेता येतो म्हणणारी अस्मिता की तुमची सेवा करण्याची दोन दिवस परवानगी मागणारी सुस्मिता?''

''बोला सासूबाई - 'ती' का 'ही'?''



दोघांनीही प्रश्नार्थक नजरेने एकमेकांकडे पाहिले. दोघांच्याही चेहेऱ्यावर 'सुस्मित' पसरले.

ए. डी. जोशी, सोलापूर
मो. ८२७५३०२१३०

४/१

## बिंग फुटेल

सडपातळ होण्यासाठीच्या औषधाची मी बेसुमार जाहिरात करत होतो - प्रतिसादपण खूप छान मिळत होता-बऱ्याच ढोल्या-ढोल्या जाड-जाड बायकांची दुकानांत गर्दी झाली होती-त्याच वेळी आमच्या दुकानाच्या मागील घरातून आमच्या बाईसाहेब-अहो-अहो-करीत डूलत डूलत येतांना दिसल्या--धावत जाऊन नोकराने त्यांना अडवले-म्हणाला ''बाई साहेब इकडे दुकानात येऊ नका''---

''कां...तू कोण मला अडवणारा - आमचे ''हे कुठायत?'' ठसक्यात बाईंनी विचारले.

''मालक ना? आहेत ना--ते सडपातळ होण्याचे औषध विकताहेत - तुम्ही आत गेलात तर त्यांच बिंग फुटेल म्हणून त्या बायकांदेखत तुम्ही आत जाऊ नका-- नोकराने बजावले.

मधु रानडे
मो. ९८५०९१४२७०

ललित

# ।। तोंड - पुराण ।।

तोंड आणि पाठ हे आपल्या शरीरातील दोन महत्त्वाचे अवयव. मानवी जीवनात त्यांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. कारण शरीराला अक्षय उर्जेचा पुरवठा करणाऱ्या अन्नाचा मार्ग तोंडातूनच जातो तर जीवनभरच्या भक्कम आधाराचा राजमार्ग म्हणजे आपल्या पाठीचा कणा! हे अवयव आपल्या हाडीमांसी इतके खिळलेले आहेत की दिवसातून दहा-पाच वेळा त्यांचा उल्लेख केल्याशिवाय आपल्याला राहावतच नाही.

मला आठवतं की लहानपणी प्राथमिक शाळेत असताना ''हाताची घडी. तोंडावर बोट'' ही गुरुजींची आज्ञा वारंवार ऐकावी लागे. तोंडावर बोट ठेवून गप्प बसणारा विद्यार्थी आज्ञाधारक समजला जाई. तोंडावर बोट ठेवण्याऐवजी 'तोंडावर हात' घेतल्यास मात्र तोंडात दोन सणसणीत दिल्या जात किंवा त्याचं तोंड चांगलच रंगवलं जाई. दुसऱ्या भाषेत सांगायचं झाल्यास कानाखाली आवाज काढला जाई. मार खाल्लेल्या मुलाचं तोंड उतरत असे आणि तोंड वर करून पाहण्याचे धाडस तो करीत नसे.

दोन भांडखोर माणसं एकत्र आली की त्यांची तोंडातोंडी होणार हे निश्चितच. अशावेळी जो प्रथम माघार घेईल तो म्हणत असतो की तुझ्या तोंडी लागणं म्हणजे मूर्खपणाच आहे. त्यापेक्षा मीच माझं तोंड काळं करतो. परीक्षा तोंडावर आली की अनेक विद्यार्थ्यांची पाचावर धारण बसते. परीक्षेला तोंड देणं त्यांच्या अगदी जीवावर येतं. परीक्षेत पास झालं तर ठीक. नाहीतर सगळ्यांपासून तोंड लपवायची पाळी! शिवाय वडीलंकडून तुझं तोंडसुद्धा दाखवू नकोस अशी बोलणी खाणं आलंच!

हातून मोठी चूक किंवा अपराध झाल्यास तुझं तोंड काळं कर अशी धमकी असते, तू आमच्या तोंडाला काळं फासलंस असंही म्हणायला लोक कमी करत नाहीत. संकटांना धैर्यानं तोंड देणाऱ्याची स्तुती होते तर त्याच्याकडे पाठ फिरवणाऱ्याला मात्र भित्रा, डरपोक समजलं जातं. वाऱ्याप्रमाणे तोंड किंवा पाठ फिरवणारा ढोंगी किंवा मतलबी संबोधला जातो. आधी कबूल करून ऐनवेळी दगा देणाऱ्या कडून तोंडघशी पडण्याची पाळी येते. अशावेळी दात घशात घालण्याची भाषा करून भरपूर तोंडसुख घेतले जाण्याचीही शक्यता असते.

एखाद्याचं तोंड रंगवणं आणि एखाद्यानं तोंडाला रंग लावणं ही शब्दरचना वरवर समानार्थी वाटत असली तरी दोन्हीच्या अर्थात खूपच फरक आहे. तोंड रंगवणं म्हणजे एखाद्याच्या थोतरीत दोन लगावणं आणि तोंडाला रंग लावणं म्हणजे नाटक-सिनेमात काम करणं, तसंच तोंडी लावणं आणि तोंडी लागणं यात एका अक्षराचा फरक असला तरी अर्थ मात्र अगदी भिन्न आहेत. रोज सकाळ-संध्याकाळी जेवताना आपल्याला काहीतरी तोंडी लावणं लागतंच. परंतु रोज कोणाच्यातरी तोंडी लागणं परवडण्यासारखं नसतं, कारण भांडकुदळ म्हणवून घेण्याची आफत! एखादं अवघड काम करताना तोंडाला फेस येतो पण तोंड आकर्षक दिसण्यासाठी मात्र फेस-पावडर लावावी लागते. एखादा महाभाग असा भेटतो की त्याच्यापुढे कितीही तोंड वाजवलं किंवा तोंडाची वाफ दवडली तरी ढिम्म फरक पडत नाही. अशावेळी तोंडाला कुलूप लावून बसणंच अधिक श्रेयस्कर. तोंडाला पान पुसणारे लोकही अनेकदा भेटतात. अशावेळी तोंड वेंगाडून बसण्यात काहीच अर्थ नसतो. बोलणाऱ्याचं तोंड दिसतं असं म्हणतात हे अगदी खरं आहे पण एखादा नेभळट, अबोल मनुष्य भेटला तर त्याच्या तोंडावरची माशीसुद्धा उडत नाही असं म्हणतात. माशीला तिथंच का बसावसं वाटतं किंवा ती त्याच्या तोंडावरून कां उठत नाही याचं मात्र मला राहून-राहून आश्चर्य वाटतं.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात फितुराला तोफेच्या तोंडी देण्याची शिक्षा फर्मावली जात असे. एखादा तथाकथित स्वाभिमानी दुसऱ्यापुढे तोंड वेंगाडायला राजी होत नाही. दुसऱ्यानं आपली परिस्थिती आपल्या तोंडावरून ओळखावी अशी त्याची अपेक्षा असते. अशावेळी तोंड दाबून बुक्क्यांचा मार खाण्याची पाळी मात्र येऊ शकते किंवा तोंडदेखलं हसून वेळ निभावून नेण्याची मखलाशी करावी लागते.

# ।। पाठ-पुराण ।।

तोंडाप्रमाणे आपल्या पाठीचंही असं अगाध महत्त्व आहे. वास्तविक पोट आणि पाठ सख्खी भावंडं! तरी पाठीवर मारा पण पोटावर मारू नका असं म्हणण्याचा प्रघात आहे. हात-पाय कितीही कणखर असोत पण ओझं वाहायला मात्र पाठच हवी. ज्याच्या पाठीचा कणा ताठ त्याला सर्वत्र मान मिळतोच पण तो म्हातारा असला तरी त्याला तरुणतुर्क समजलं जातं. पाठीचा कणा हा सर्वार्थाने आपल्या जगण्याचा मुख्य आधार असतो. कारण त्याच्या ताठपणावरच आपलं शरीर भक्कमपणे उभं राहू शकतं. पाठीच्या तळाशी एक असा बिंदू आहे की त्याला धक्का लागल्यास कमरेखालचं सारं शरीर चेतनाहीन लुळं-पांगळं होऊन जातं. अष्टांग योगाच्या अभ्यासात पाठीच्या कण्यात असणाऱ्या चक्रांना फार महत्त्वाचं स्थान आहे. योगसिद्धी प्राप्त करायची असेल तर कुंडलिनी जागृत करावी लागते आणि तिचा मुक्कामही पाठीच्या कण्यातच असतो. ज्ञानेश्वरांसारख्या तपस्व्यानं आपल्या पाठीवर मांडे भाजून दिल्याची कथा सर्वश्रुत

आहेच. आपण मात्र केवळ मनात मांडे खाण्यावर समाधान मानतो.

धपाटे खाण्यात पाठ नेहमीच आघाडीवर असते. पण शाबासकीची थापही प्रथम पाठीवरच दिली जाते. एखादा उगाचंच आपली पाठ थोपटून घेत असतो ही गोष्ट निराळी. दु:खी-कष्टी माणसाच्या पाठीवरून हात फिरवला की त्याला मोठा दिलासा मिळतो आणि पुढं होऊन लढणाऱ्यालासुद्धा पाठीवरच्या आश्वासक हातानं हत्तीचं बळ प्राप्त होतं. आपल्या पाठीवर श्रीरामाच्या बोटाचे ठसे वागवणारी खारुताई तर आपल्या चांगलीच परिचयाची आहे. एखाद्याचे अनेक अपराध पोटात घालून त्याला पाठीशी घालणारे जसे भेटतात तसेच ऐनवेळी पाठ फिरवणाऱ्यांचीही संख्या काही कमी नाही. कर्तव्य करताना मोहाकडे पाठ फिरवणारी माणसं हल्लीच्या काळात दुर्मिळच. पण जवळचा मित्र म्हणवणारी संधिसाधू माणसं मोक्याच्या वेळी खंजीर खुपसतात तो पाठीतच!

केवळ निवडणूकीच्या काळात तोंड दाखविणारे गेंड्याच्या पाठीचे पुढारी आपण नेहमीच पाहतो. त्यांना पाहिजे असतो मतदारांचा पाठिंबा! पण एकदा का ते निवडून गेले की पुढील पाच वर्षं त्यांची पाठ फिरलेलीच असते. अशी राजकारणी माणसं स्वार्थासाठी केव्हा कुणाला पाठीशी घालतील हे जसं सांगता येत नाही तसंच वेळ पडल्यास कुणाच्या पाठीमागं लपतील याचाही भरवसा नसतो. आपल्या उच्च ध्येयाच्या पूर्तीसाठी आपल्या आदर्शांचा पाठपुरावा करणारे निष्ठावान आणि आश्रयाला आलेल्यांची जीवाची बाजी लावून पाठराखण करणारे महामानव आपल्याला इतिहासातच पाहावे लागतात. आजकालच्या स्वार्थी आणि मतलबी जगात 'सुसरबाई, तुझीच पाठ मऊ' म्हणणारे दांभिकच अधिक भेटतात

दोन मल्लांच्या कुस्तीत पाठीवर स्वार होणाऱ्याला अधिक गुण मिळतात पण मातीला पाठ लागली की सारा खेळच खल्लास! पाठीला डोळे नसतात हे खरं. पण आपल्या पाठीमागं कारवाया करणाऱ्यांची, मग तो कितीही जवळचा का असेना, पाठवणी करावीच लागते. एखादं प्रकरण पाठीवर शेकलं की जशी पळता भुई थोडी होते तसंच एखाद्या सुंदरीच्या पाठी लागणं किती महागात पडेल हे सांगता येत नाही.जीवनात सुख-दु:खांच्या पाठशिवणीचा खेळ कुणालाच चुकलेला नाही पण त्यासाठी संसाराकडे पाठ फिरवण्याची आवश्यकता नसते. भित्यापाठी ब्रह्मराक्षस ही म्हण लक्षात ठेवून येणाऱ्या संकटाची पाठ तिंबण्याची तयारी ठेवणे हे सर्वात उत्तम!

**गोविंद करमरकर**

**१७/१४ मो. ८८०५९५९८२४**

# श्रावण

आला श्रावण श्रावण गात सृष्टीचे कवन
ऐका पावसाची धून सारे तल्लीन होऊन
साद घालत आला पवन मंद झुळुक होऊन
शीळ घालत आनंदानं जणू शीळ वाजवीत
आला कान्हा जणू बासरी होऊन
खेळवीत लतिकांना जणू श्रीकृष्ण होऊनं!

आला श्रावण श्रावण पक्षांचे गोड गान
आली 'पेरते व्हा, पेरते व्हा' मंजूळ तान
ऐकूनी मंजुळ तान स्तब्ध झाले कोकीळ गान
मुग्ध झाली हिरवी रानं तरारली आनंदानं
मुग्ध झाले पशुधन बागडू लागले आनंदानं
तृप्त झाला बळीराजा शिवारं भरली
धन धान्यानं, सुख-समृद्धी राशीनं!

आला श्रावण श्रावण तृप्त झाला पवन वरुण
साद घालत आला अरुण संगे कोवळे कोवळे ऊन
डोकावत इंद्रधनू आला सप्तरंगी किरणातून
सुखावल्या वृक्ष तरूवेली बहुरंगी पुष्पातून!

आला श्रावण श्रावण आले आनंदा उधाण
रोज नवा नवा सण आले व्रतवैकल्या उधाण
आले भक्तीभावाला उधाण ईश्वराला सारे शरण
श्रावण ईश्वराचं लेणं श्रावण निसर्गाच लेणं
जतन करू आनंदानं ऐका पावसाची धून
भक्ती भावात रंगून सारे तल्लीन होऊन!

**सदानंद फडणीस, कोल्हापूर**

**७२/१४ फोन नं. ०२३१-५२८३३३**



# चुकीची समजूत

रमाकाकू : माझे आईचे म्हणणे मी ऐकले असते आणि तुम्हाला नकार दिला असता तर मी सुखी झाले असते!

रामभाऊ : काय सांगतेस! तुझे आईचा विरोध होता आपल्या लग्नाला?

रमाकाकू : हो!

रामभाऊ : अरे देवा! आणि मी त्यांना उगीचच वाईट समजत होतो.

**पुरुषोत्तम देशपांडे, अमरावती**
**मो. ९७६४९७४४२२**

ललित

# शपथा-अश्या आणि तश्या...

दोन मित्र-मैत्रिणी किंवा काही मित्र-मैत्रिणींचा गट यांच्यात आपापसात गप्पागोष्टी चालू असतात. त्यावेळी मध्येच एखादी व्यक्ती ''तुमचा कदाचित विश्वास बसणार नाही, पण 'आईशप्पथ' सांगतो/सांगते की...'' असं म्हणून एखादी घटना, प्रसंग वर्णन करून शपथपूर्वक सांगते. या वेळी त्या व्यक्तीने सांगितलेली घटना बहुधा खरीच असते आणि ती शपथपूर्वक सांगितलेली असल्यामुळे ऐकणाऱ्याचा त्यावर विश्वास बसतो. आपल्या दैनंदिन जीवनात असे प्रसंग वारंवार घडतात. साक्षात् आईची म्हणजेच जगातील सर्वात श्रेष्ठ व पूज्य व्यक्तीची शपथ घेतली जाते हे आपला विश्वास बसण्याचं प्रमुख कारण असतं.

या शपथांनासुद्धा मोठी मजेशीर परंपरा आणि इतिहास आहे, त्यांना अनेक पैलू आहेत याची आपणास कल्पना आहे का? इतिहासात डोकावून त्याचंच आपण येथे दर्शन घेणार आहोत.

आपल्या देशात विविध ठिकाणी कोणत्या ना कोणत्या निवडणुका होत असतात. त्यावेळी मतदान पार पडते. मतदानाचा पवित्र अधिकार भारतीय राज्यघटनेनेच आपल्याला प्रदान केलेला आहे. तो आपण कर्तव्यबुद्धीने वापरावा, आपण न चुकता मतदान करावे अशी अपेक्षा असते. पण तो अधिकार सर्वजण क्वचितच वापरतात. म्हणूनच शंभर टक्के मतदान झालेले आपल्याला कधीच आढळत नाही. मतदारांची उदासीनता, आळस, अज्ञान नि निष्क्रियता अशा गोष्टी याला कारण आहेत. म्हणूनच मतदानाची टक्केवारी वा प्रमाण वाढावे यासाठी मतदारांमध्ये जागृती करणं आवश्यक ठरतं. असा प्रयत्न मागील लोकसभा निवडणुकीपूर्वी केला गेलेला सर्वांनी अनुभवला. या प्रयत्नाचा भाग म्हणून ठिकठिकाणी 'सामुदायिक शपथा' सार्वजनिकरित्या दिल्या घेतल्या गेल्या. 'मी निवडणुकीत माझा मतदानाचा पवित्र अधिकार बजावेन आणि मतदान करेन.' अश्या शपथा असंख्य लोकांनी घेतल्यामुळे त्याचा अनुकूल परिणाम दिसून आला आणि मतदानाच्या टक्केवारीत वाढही झाली.

आपल्या देशात पाणीटंचाईचा प्रश्न गंभीर बनलेला आहे. भारतालाच नव्हे तर जगातील अनेक देशांना हा प्रश्न भेडसावतो आहे. या पाणीप्रश्नातून जागतिक महायुद्ध भडकेल की काय अशीही भीती अनेक विचारवंतांकडून वेळोवेळी जाहीरपणे व्यक्त केली जाते. पाणीटंचाईच्या या गंभीर प्रश्नाला सामोरे जाण्याचा प्रयत्न विविध प्रकारे होताना दिसतो. पुण्याच्या 'सकाळ वृत्तपत्र समूहा'ने येथील पाणीप्रश्न सोडविण्याच्या प्रयत्नांचा भाग म्हणून 'सर्वजल अभियान' काही दिवसांपासून राबविलेले आहे आणि त्यातील'पाणीबचतीच्या सामुदायिक शपथ ग्रहणा'चे कार्यक्रम सार्वजनिकरित्या आयोजित केले आहेत या सामुदायिक शपथ ग्रहणाने लोकजागृती व लोकशिक्षण साधण्यास साह्यच झाले आहे.

वैद्यकीय किंवा कायदेविषयक अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या व्यक्तीला त्या व्यवसायात प्रत्यक्ष शिरण्यापूर्वी त्या व्यवसायाशी प्रामाणिक राहण्याची प्रतिज्ञा शपथपत्राद्वारे करावी लागते. या प्रथेमागील हेतू उदात्त असतो. शासकीय वा अन्य अनेक कार्यालयांमध्ये नोकरी लागल्यानंतर 'गोपनीयता व प्रामाणिक कर्तव्यपालना'च्या प्रतिज्ञापत्रकावर स्वाक्षरी त्या कर्मचाऱ्याकडून प्रारंभीच घेतली जाते. हादेखील शपथविधीचाच प्रकार नव्हे काय? शालेय पुस्तकातूनही विद्यार्थ्यांनी घ्यावयाची प्रतिज्ञा छापलेली असते. हा सुद्धा शपथग्रहणाचाच भाग असून त्याद्वारे सुसंस्कार व सद्वर्तन साधण्याचा प्रयत्न केला जातो.

न्यायालयामध्ये साक्षीदाराच्या पिंजऱ्यात येऊन साक्ष देणाऱ्या प्रत्येक साक्षीदाराला प्रथम त्याच्या पवित्र ग्रंथावर हात ठेवून किंवा सदसद्विवेक बुद्धीला स्मरून वा ईश्वरसाक्ष खरं बोलण्याची शपथ अनिवार्यपणे घ्यावी लागते. अर्थात अशी शपथ घेऊनही पुष्कळदा साक्षीदार खोटं बोलतात किंवा सत्य दडवून ठेवतात ही गोष्ट वेगळी. यशस्वी वकीलाचं वर्णन तर 'खोट्याचं खरं व खऱ्याचं खोटं' बेमालूमपणे करणारा असं केलं जातं हे सर्वश्रुतच आहे. आमदार, खासदार, मंत्री, मुख्यमंत्री, प्रधानमंत्री, राज्यपाल, न्यायाधीश आदींना राज्यघटनेनुसार शपथ घ्यावी लागते. या शपथविधी कार्यक्रमाचं विशेष आयोजन समारंभपूर्वक अमाप पैसा खर्च करून केलं जातं. अर्थात् यापैकी कितीजण आपल्या शपथेला जागतात हा संशोधनाचा विषय आहे.

पुष्कळदा आपण जे बोलतो ते अगदी मनापासून आणि शंभर टक्के खरं आहे याची ऐकणाऱ्याला खात्री पटावी म्हणून आपल्या अत्यंत प्रिय वा आदरणीय व्यक्तीची किंवा इष्ट देव-देवतेची शपथ घेतो. त्यामुळे ऐकणाऱ्याचाही आपल्यावर विश्वास बसतो. आपण जेव्हा एखादी गोष्ट न करण्याचं (उदाहरणार्थ, दारू न पिण्याचं किंवा धुम्रपान न करण्याचं) किंवा एखादी गोष्ट वा चांगला उपक्रम न चुकता नियमितपणे करण्याचं निश्चयपूर्वक सांगतो किंवा शपथपूर्वक आश्वासन देतो तेव्हा ती गोष्ट न करण्याचं वा करण्याचं उत्तरदायित्व आपल्यावर येतं. यावरच आपली विश्वासार्हता अवलंबून असते.

प्रामाणिकपणे घेतल्या जाणाऱ्या मनापासूनच्या शपथांप्रमाणेच खोट्या व साळसूदपणाने शपथा घेणारे महाभागही पुष्कळदा आपल्याला भेटतात. काही वेळा मनापासून व स्वयंस्फूर्तीने शपथ घेतली जाते तर काही वेळा ती जबरदस्तीने घ्यावी लागते. जबरदस्तीने घ्याव्या लागलेल्या शपथेला कमकुवत मनाचा माणूस जागण्याचा प्रयत्न करतो तर निर्ढावलेला माणूस अशी शपथ सहजपणे झुगारून देतो.

शपथविधीचे जाहीर कार्यक्रम होतात तेव्हा शपथ देणारा व

शपथ घेणारा अशा दोन भूमिका वठवल्या जातात. बहुधा शपथ देणारी व्यक्ती उच्च वा श्रेष्ठ दर्जाची आदरणीय स्थानावरील असते तर शपथ ग्रहण करणारी व्यक्ती त्या मानाने कमी दर्जाची वा कनिष्ठ पदावरील असते.

इतिहासाच्या कालपटावर काही शपथा अगदी कायमच्या कोरलेल्या व संस्मरणीय झालेल्या आहेत. अश्या स्फूर्तिप्रद शपथांचं स्मरण केल्याशिवाय ह्या विषयाला न्याय मिळणार नाही; किंबहुना ते आपलं कर्तव्यच आहे. यापैकी प्रथम उल्लेख करावयास हवा तो हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांनी रोहिडेश्वरावर आपल्या निवडक मावळ्यांसह घेतलेली स्वराज्याची म्हणजेच स्वत:चे स्वतंत्र हिंदवी साम्राज्य स्थापन करण्याची घेतलेली ऐतिहासिक शपथ! त्यानंतर आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके व त्यांच्या सहकाऱ्यांनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध लढण्याची घेतलेली शपथ इतिहासात अमर झालेली आहे. हे कार्य कर्तव्यबुद्धीने पार पाडीत असता अनेकांनी आपलं सर्वस्व झुगारून हौतात्म्य पत्करलं आहे. त्यांचं हे अपुरं राहिलेलं स्वातंत्र्य संपादनाचं कार्य पुढे चालविण्यासाठी स्वातंत्र्यवीर सावरकरांनी तर लहान वयातच आपल्या घरातील अष्टभुजा देवीसमोर 'ब्रिटिश सत्तेविरुद्ध सशस्त्र क्रांतीचा केतू उभारून मारिता-मारिता मरेतो झुंजेन' अशी उग्रभीषण शपथ प्रतिज्ञापूर्वक घेतली. तश्या प्रकारच्या शपथा त्यांच्या अभिनव भारत संघटनेच्या सदस्यांनीही वेळोवेळी घेतल्या आणि त्यांच्या पूर्ततेसाठी अनेकांनी हसतहसत हौतात्म्य पत्करलं. या शपथा म्हणजे आपल्या राष्ट्राच्या तेजस्वी इतिहासाच्या ऊर्जस्वल खुणाच असून स्फूर्तिप्रद इतिहास घडविण्याचं सुप्त सामर्थ्यच त्यात दडलेलं आहे.

क्वचित प्रसंगी एखादी व्यक्ती दुष्ट बुद्धीने किंवा सूड उगविण्याच्या ईर्षेने शपथबद्ध होऊन प्रयत्न करते. त्यात यशस्वीही होते. येथे शपथेतील सामर्थ्य त्या व्यक्तीला कार्यसिद्धी प्राप्त करुन देते. असं असलं तरी चांगली अवघड गोष्ट संपादन करण्यासाठी शपथपूर्वक प्रयत्न करण्याचं एखादी व्यक्ती ठरवते तेव्हा त्या यशस्वी होण्यास ठाम निश्चय, निष्ठा, प्रामाणिकपणा व अथक परिश्रम कारणीभूत होतात आणि शपथेनुसार कार्य घडते. ध्येयसिद्धी प्राप्त होते. शपथांचे हे विविध पैलू, कंगोरे आणि स्वरूप समजून घेणे खरंच मनोरंजक व उद्बोधक आहे.

अर्थातच तात्पर्य असे की, आपण शपथा अवश्य घ्याव्यात; पण त्या चांगल्या कार्यासाठी, उच्च-उदात्त ध्येय गाठण्यासाठी घ्याव्यात. त्यामुळे आपण घेतलेल्या शपथेचं सार्थक होईल आणि आपल्यालाही ध्येय प्राप्तीचं उच्च प्रतीचं समाधान लाभेल. आई शप्पथ!

**क्रांतिसेन रामचंद्र आठवले, पुणे**
**मो. ९८६११४१६११.**

## हिंदी दिवस

हिंदी के प्रयोग को बढावा देने हेतू
कार्यशालाका किया आयोजन
उद्घाटन भाषण में बोल उठे जी. एम्.
लेडीज अँड जंटलमन,
कार्यक्रम जैसेही शुरू हुआ
हिंदी प्रेमी भाई खडा हुआ
झल्लाया लाल होकर
आपतो कमाल करते हो
वर्कशॉप है हिंदी का
स्पीच देते हो अंग्रेजी में
क्या मतलब है हिंदी के प्रयोग का
जी.एम भी खौल उठे
नॉनसेन्स, बैठ जाओ
कार्यशालाका किया उद्घाटन
उसे वर्कशॉप कहता
भाषण दे रहा हू हिंदी में
उसे स्पीच कहता
वह सज्जन भी बोल उठा
अरे वा, अब तो क्लायमॅक्स हो गया
सुनते जा रहा हू - आप स्टॉपही नही होते
सुनकर झगडा, ए.जी.एम. आये बीचमें
अॅडव्हान्स दिया बिनामतलबका
सर आप कॉम्प्रमाईज कर लो
डिक्लेअर कर दो उद्घाटन हुआ है
हिंदी का प्रयोग सक्सेस हुआ है

**८१/१३ अरुण सावरकर (९८९२८१२८३८)**

## कधी वाटते

कधी वाटते मोबाईल व्हावे
तिच्या मऊ मुठीत गच्च मिटावे..
कधी वाटते छत्री व्हावे
तिच्या नाजूक हाताशी चाळे करावे..
कधी वाटते पर्स व्हावे
तिच्या खांद्यावरून मस्त हिंदकाळावे..
कधी वाटते रबरबँड व्हावे
तिच्या केशकलापात गुंतून जावे..
कधी वाटते गॉगल व्हावे
तिच्या डोळ्यात पाहात राहावे..
कधी वाटते... नुसतेच काय वाटावे
सत्यातही कधीतरी तसे घडावे..

**६१/१४ विजयकुमार देशपांडे (९०११६६७१२७)**

# कथा ही एका शेपटीची

शाळेतला एक जुना प्रसंग मला सहज आठवला. त्यावेळी मी मराठी शाळेत इयता ४थीत होतो. गुरुजी विद्यार्थ्यांचे पाटीवर सोडविलेले गणित तपासत होते. माझा गणित विषय अत्यंत नावडीचा होता, अर्थात आवडीचा एकही नव्हता. नेहमी प्रमाणे माझे गणित चुकलेलेच होते गुरूजी मला ओरडले, माझा कान पिळला. लहानपणी माझ्या कानाचा उपयोग मला ऐकू येण्यापेक्षा गुरूजींना व पालकांना पिळण्यासाठीच जास्त झाला. ''वशा! अरे गाढवा!'' ''एवढे साधे गणित तुला येत नाही? मूर्खा! जरा डोकं वापर रे! तू जर डोकं नीट वापरलं नाहीस, तर त्याचा काय उपयोग?'' हे ओरडून सांगत असतांना त्यांनी आणखी माहिती सांगितली. ती मात्र मला नवीन अन् अद्‌भूत वाटली. ते पुढं म्हणाले. ''अरे! माणसाला फार पूर्वी माकडाला असते तसे शेपूट होते, पण ते त्याने न वापरल्याने कालांतराने हळूहळू नष्ट झांल. पण ते होते याची खूण अजूनही आपल्या पाठीच्या कण्याच्या शेवटी शिल्लक आहे, त्यालाच आपण आज माकड-हाड असे म्हणतो.''

सर्व मुलांनी हळूच आपला मागील भाग चाचपून पहिला, व असे काहीतरी हाड शेवटी आहे याची खात्री करून घेतली. तशी खात्री मीही करून घेतली. गुरूजी पुढं म्हणाले ''त्या शिवाय आपले कान ते देखील पूर्वी चतुष्पाद प्राण्यांप्रमाणे हलविता येत होते. पण मानवानं ते हलविणं सोडलं व आता कान आपल्याला हलविता येत नाहीत! काही महाभाग मात्र कान हलवू शकतात, पण त्याला अभ्यास लागतो.

ही गोष्ट मला आता अचानक आठवली आणि माझ्या मनात आले, की आपल्या पूर्वजांनी ही फार मोठी चूक केली. त्यांनी का आपले शेपूट वापरले नाही? उगाचच आपला एक अवयव कमी झाला! अरेरे, मला फार वाईट वाटले. पण नंतर पुन्हा मी विचार करू लागलो की, जसा एखादा अवयव हळूहळू नष्ट होतो, तर एखादा अवयव पुन्हा नव्याने पुढील पिढीत येऊ शकतो. काही लोकांना हाताला किंवा पायाला पाच ऐवजी सहा बोटे मी पाहिली आहेत. (एकबोटे आडनावाच्या लोकांना मात्र सर्व हाता-पायांची मिळून वीस बोटे असतात हेही मी प्रत्यक्ष पाहिलेले आहे) आपल्या हिंदु पुराणात रावणाला दहा तोंडे, दत्तात्रयला तीन तोंडे, महादेवाला एक एक्स्ट्रॉ डोळा. पण महादेवाचा तिसरा डोळा म्हणजे समोर आलेला खल्लासच! देवींचा प्रकार ही अष्टभुजा-दशभुजा आहेत.

समजा मनुष्य प्राण्याला आजच्या काळात एक शेपटी प्राप्त झाली तर काय मज्जा येईल! काय काय गमती होऊ शकतील. आणि शेपटी संबंधी जीवनातले विविध प्रसंग समोर येऊ लागले.

बाळाचा जन्म झाला आहे. सर्व नातेवाईक स्त्रिया/मैत्रिणी बाळाच्या पाळण्याभोवती त्याला कौतुकानं पाहात आहेत ''डोळे बघ किती पाणीदार अन् मोठे मोठे आहेत. नाक अगदी वडीलांसारखे सरळ आहे.'' रंग मात्र आईचा घेतला हे बरं झालं बाई! ''जावळ भरपूर असून मऊ आहे.'' ''बोटं बघ किती लांबसडक आहेत'' म्हणजे मोठा कलाकार होणार. तसं शेपटी बद्दल काय म्हणतील वा! शेपटी चांगलीच लांब आहे आणि गोंडा पण भरघोस आहे. शेपटी लांब असेल तर बाळ मोठेपणी चपळ खेळाडू होणार.

मुलं चार/पाच वर्षांची झाली की घरा-घरात दंगामस्ती होणार, मुलींच्या वेण्यांची जशी खेचा-खेची होते, तशी शेपट्यांची खेचाखेची होणार. लहान भावंडं मोठ्या भावंडा बद्दल आईकडे तक्रार करणार, मग आई रागावणार ''थांब आता मी त्याच्या शेपटीला चटकाच देते!'' म्हणून दम भरणार.

शाळेत वर्गातली मुलं दंगामस्ती करताना फटाफट एकमेकांना शेपट्या मारतील. पुढच्या बाकावरील मुलाची शेपटी. मागच्या बाकावरल्या मुलाच्या डेस्कवर आली तर तो पुढच्यास दम भरणार. ''ए! तुझी शेपटी खाली घे, नाहीतर चड्डीत घाल किंवा माझ्यासारखी कमरेला गुंडाळ. शेपटीसाठी चड्डी अथवा पॅन्टला छिद्र ठेवावे लागेल का?''

शेतकरी दादा जसा बैलजोडी हाकतांना बैलाच्या शेपट्या पिळतो, तसे गणित चूकले म्हणजे, गुरूजी कान पिळतात तसे शेपटीही पिळतील कां?

मुली/स्त्रिया शेपटीचा गोंडा सजवतील का? वेणीला जसे, रिबीन, गजरा, क्लिप्स् लावतात तसे शेपटीच्या गोंड्यालाही सजवतील कां?

लग्नात वधूची साडी/शालू आणि वराचे उपरणे यांची गाठ मारतात. सप्तपदी होते. हातात हात दिले जातात, त्याच पद्धतीने वधु-वराच्या शेपट्यांची गाठ भटजी मारतील का?

Two Wheeler वरून जाताना डावी-उजवीकडे वळण्यासाठी हात दाखविला जातो. त्याऐवजी शेपटीने इशारा दिला तर चालेल का? चौकातला Traffic Police दोन हातांबरोबरच शेपटीने मागच्या मागे वाहन चालकांना इशारा देऊ शकेल?

महिला वर्ग शेपटीला कशा प्रकारे सजवतील, ड्रेस किंवा साडीला मॅचिंग असे आवरण घालतील का Sleevless घालून दंड उघडे ठेवतात तशी Clothless शेपूट दाखवतील?

रस्त्यावर मारामारी हाणामारी झाली म्हणजे माणसं दोन हात, दोन पाय यांचा आलटून पालटून उपयोग करतात व त्यांचा तोंडाचा स्पिकर शिव्या ओतीत असतो, त्यात शेपटी या अवयवाची भर पडेल व एकमेकांना शेपटीने फटके दिले घेतले जातील.

बऱ्याचश्या कार्यालयात, बँकामधून, सहकाऱ्यांचा विशेषत: Boss चा उद्धार त्याच्या पश्चात त्याच्या शारीरिक व्यंगावरून केला जातो, वा तशी पद्धत आहे. उदा. चकाष्या, चष्मीष्ट मिचमिच्या टकल्या, ठेंगू, लंबू, जाड्या, साडेतीन फुट्या त्यात आखुड शेपट्या, वा लांब शेपट्या याचीही भर पडेल.

आपले नेते जे नेहमी विधान सभेत, लोकसभेत सभागृहात, गोंधळ घालतात. हमरीतुमरीवर येतात, तेव्हा कागदांची फाडाफाडी फेकाफेकी, माईकची मोडतोड करतात. नंतर सभापती समोर गर्दी करतात. हातवारे करून घोषणाबाजी करतात. तेही आपापल्या शेपट्या उंच करून हवेत उडवतील T.V.वर असे दृष्य फारच आकर्षक दिसेल ना?

आजकाल स्त्रियांवरील अत्याचारात खूप, वाढ झालेली आहे, त्या संबंधी कायद्याने कठोर शिक्षाही सांगितली आहे. गर्दीच्या ठिकाणी स्त्री-पुरुषांच्या शेपट्या एकमेकांना लागण्याची शक्यता आहे. पुरुषांना लागली, तर ठीक आहे. काहींना त्यात आनंदही वाटेल, पण स्त्रीला पुरुषाची शेपटी लागली तर तो तिचा विनयभंग ठरेल का?

आपल्या मराठी भाषेत शेपटी वर काही वाक्प्रचार, म्हणीही आहेत. उदा. जीवावरचं शेपटीवर निभावलं, हत्ती गेला अन् शेपूट राहिलं, कुत्र्याचे शेपूट वाकडे ते वाकडेच, शेपटीवर पाय देणे, इ. सर्व म्हणी-वाक्प्रचार आपल्याला शेपटी नसून आपण वापरतोच की!

रामायणात मारुतीरायाने आपल्या शेपटीने रावणाची सारी लंका जाळली, म्हणजे हा शेपटीचा दुरूपयोगच नाही का? तसेच जर आपण केले, तर अनेक प्रकारांच्या अराजकाने हैराण झालेला आपला देश, शेपटी या एका Extra अवयवाने आणखीनच रसातळाला जाण्याची शक्यता आहे. म्हणूनच मला विचाराअंती असे वाटू लागले आहे की आपले पूर्वज हुषार होते. त्यांनी डोकं वापरून दूरदृष्टीने आपल्या शेपटीचा वापर टाळला, व तो आपला अवयव कालांतराने नष्ट झाला.

आपल्या बुद्धीमान पूर्वजांना धन्यवाद दिले पाहिजेत!

**वसंत धुपकर, पुणे**
**फोन : ०२०-२०२५५४०८**

# हळहळ

जातीभेदाचं प्रस्थ माजवून, खानदानी म्हणविणाऱ्या
माझ्याच माणसांकडून तुला माझ्यापासून तोडायचं होतं.
आपलं खरोखरीचं प्रेम त्यांच्या कधी खिजगणतीतही नव्हतं
गरिबीत वाढून, कष्ट करीत तू मोठा कर्तबगार झालास
हेही नव्हतं त्यांच्या हिशोबी
कुणावर तरी मी प्रेम केलं! म्हणजेच गुन्हा केला
असंच बहुधा लिहिलं असावं माझ्या नशिबी
निव्वळ जात पात, म्हणून बदलत्या काळातही
त्यांना कात टाकायची नव्हती
आपण दोघं चोरून भेटतो! हे कळताच,
त्यांनी कुणाला तरी तुला मारण्याची सुपारी दिली
आपण एकमेकांत मनापासून गुंतलो होतो
यात आपली अशी काय मोठी चूक झाली?
माझ्या बंदिस्त अवस्थेत, तुला सावध करण नाही जमलं
अखेर माझ्या घरातल्याच हैवानांनी
दावा साधून तुला ठार मारलं
भविष्यात माझ्या वैराण आयुष्यात,
हळहळण्याशिवाय दुसरं काय उरलं?
यापुढे माझी रक्ताची नतद्रष्ट माणसं, जे ठरवतील
त्याप्रमाणे एखाद्या निर्जीव बाहुलीगत
माझी वाटचाल करावी लागेल मला
आता कसं, केव्हा आणि कुठेः मी सांगणार तुला
विपरीत असं घडल्यावर, ओठावर आलेले अखेरचे शब्द,
अंतराळातून ऐकून घे
सूना हू! चिल्हाते, चिल्हाते
ये दुनिया छोडके आप चल बसे आगे
या क्षणी ठासून तुला सांगते
लवकरच पाठोपाठ मी येणार आहे तुझ्या मागे
तोवर तरी, तुझी आठवण, तुझं निस्सीम प्रेम
हे मात्र अखेरपर्यंत मी हृदयात जपणार आहे
निरोप न घेता गेलास देवाघरी! उगाचंच वाटतंय
केव्हाही, कधीतरी पुन्हा परत फिरशील माघारी
हतबल झालेय आता माझ्या हाती काहीच राहिलं नाही
कारण ह्या जन्मी तुला भेटणं मुळीच शक्य होणार नाही
'पुढच्या जन्मी, तरी माझ्या प्रियकराची,
अर्थात तुझी साथ अविरत मला मिळू दे हीच प्रार्थना
वरून बोलवणं येईपर्यंत, सतत करीत राहीन, मी देवाकडे.

**नरेन चव्हाण, कुर्ला**
**मो. ९३२४९७३३८८**

ललित

# कौतुकाची थाप

सकाळपासून धावपळ सुरू होती सुरेखाची. पहाटेच अंगण झाडून, सडा रांगोळी करून, मुलांना उठवून, त्यांचं सगळं आवरून शाळेत रवाना करून आता सुमीतरावांची तयारी करायल तिने सुरुवात केली. डबा, रुमाल, किल्ली, पाणी बाटली सगळं ठेवून बाकीचं आवरायला गेली. तोच सुमीतची जोरदार हाक आली.

''अगं ए! काय चाललंय तुझं? माझे मोजे दिसत नाहीत. कितीदा सांगितलं नीट ठेवत जा. वेळेवर धावपळ होते गं माझी. तुम्हाला काय तुम्ही दुपारी झोपा काढू शकता. आमचं तसं नाही. दिवसभर मरावं लागतं त्या ढापण्या साहेबाच्या हाताखाली. जरा लवकर दे गं!'' सुरेखाने एकदाचे मोजे हातात ठेवले. बोलणी ऐकली पण न ऐकल्या सारखं दाखवून हसत निरोप दिला. 'सावकाश जा हो' सांगितलं आणि सुरेखा धपकन् सोफ्यावर बसली.

एवढी पहाटेपासून रात्रीपर्यंत मरमर मरते, सगळं तयार ठेवते, तरी रोज जाताना कटकट. हे नाही ते राहिलं असा नेहमीचा उद्धार चालूच. ती अगदी कंटाळली होती ह्या सगळ्या गोष्टींना. खूप राग यायचा तिला. अरे! मीच का करायचं सगळं? जरा आंघोळीचे कपडे, रूमाल, मोजे, स्वत: घेतलं तर काय होतं, पण नाही. ह्यांना सगळं आयतं हवं. माझी धावपळ कुणालाच दिसत नाही. घरातल्या सकाळच्या कामाचा मेळ जमवून पुन्हा घाईघाईनं बिल भरायला, बँकेच्या कामांना जायचं असतं. सामान, भाजी येता जाता अनेक कामं असतात. परत संध्याकाळचं मुलांचा अभ्यास, शुभंकरोती म्हणून घ्यायची असते. वृद्ध सासुबाई व सासऱ्यांचं सातच्या ठोक्याला जेवण तयार ठेवणं अशी सगळी लगबग असते.

सुमीत येईपर्यंत सुरेखाचा जीव अगदी दमून जायचा. आल्यावर पटकन हात तोंड धुणं उरकायचं नाहीच. पुन्हा हसरा चेहरा ठेवून जेवण करून, मागचं आवरून झालं की सकाळसाठी फ्रिजमधली भाजी बाहेर काढून, दही लावून, मुलांची डब्याची तयारी करून मग झोपायच्या तयारीला लागायचं. परत सुमीतची हाक यायची ''ए आवरलं की नाही तुझं? काय ग तू अशी कंटाळलेली? जरा म्हणून उत्साह नाही तुला. जरा फ्रेश राहत जा. आमच्या ऑफिसमधल्या रेखा, पौर्णिमा, रिमा दिवसभर कशा फ्रेश असतात. सगळ्यांशी अगदी हसून खेळून बोलत असतात. निरनिराळे पदार्थ डब्यात घेऊन येतात मजा येते''

सगळं ऐकून इकडे सुरेखाचा आतून राग राग होतो. लोकांचे कौतुक ऐकून अगदी वीट येतो. इथे मी पहाटेपासून यंत्रासारखी काम करतेय. सगळं नीट सांभाळतेय. मी नसेन का थकत? माझा कुणी विचारच करत नाही. कधी प्रेमाचा हात कुणी पाठीवर फिरवत नाही. नुसतं घाण्याला जुंपल्यासारखं राबत राहायचं. सुरेखाला वाटायचं, मुलांसमोर, मोठ्या माणसांसमोर तरी सुमीतने तिला रागवू नये. एकांतात चुका प्रेमाने समजावून सांगाव्यात. अगं तू दमतेस फार. तुझी खूप तडतड होते, एवढं म्हटलं तरी सुद्धा बरं वाटतं. दहा चांगल्या गोष्टी झाल्यातरी जे राहिलं त्याची टोचणी देत रहायची. अहो! पाठीवर कौतुकाची थाप कोणाला नको असते?

उत्तम काम केल्याबद्दल साहेबांनी केलेले कौतुक, गुरुंनी शिष्याला दिलेली शाबासकी, आई-वडिलांनी मुलाचं केलेलं कौतुक, मोठ्या भावाला आपल्या लहानग्या भावाचं वाटणारं कौतुक, सासुबाईंनी सुनेने केलेली एखादी गोष्ट आवडली असं सांगणं, तसंच मॅच संपल्यावर खेळाडूंचं प्रेक्षकांनी केलेलं कौतुक हे झालं आपलं. अहो! प्राण्यांना सुद्धा त्यांच कौतुक म्हणजे त्यांच्या पाठीवर प्रेमाने थोपटलं, हात फिरवला तर त्यांना पण बरं वाटतं. त्यांच्या शरीराची वेगळी थरथर होते. त्यांच्याकडे पाहिलं तर यांचे डोळे पण आपल्या सांगतात की त्यांना बरं वाटलंय. कुत्रा असला तर पाय चाटू लागतो. मांजर लाडावून अंग घासून जाते तर कधी मांडीवर येऊन बसते. गाई स्नेहाळ नजरेने आपल्याकडे बघतात. मग आपणच असे का? कारण अहंकार, मान, सन्मान ह्या सर्व गोष्टींना आपण महत्त्व देतो आणि ह्याच छोट्या छोट्या गोष्टींचा आनंद घ्यायला व द्यायला विसरतो.

मोठ्यांचं अनुकरण लहान पण करतात. एकमेकांच्या भावना जपल्या, त्यांचा आदर केला तर संबंध सुधारतील. आवड निवड जपणं हा पण कौतुकाचाच भाग आहे. हे दोघांकडून झालं तर काय बहार येईल! राग लोभ झाला तरी तो सबुरीने मिटवून टाकायचा. कौतुकाच्या थापे इतकं चांगलं औषध नाही हे सर्वांनीच लक्षात ठेवावं.

**सौ. निशा ग. चिपळूणकर**
४४/१४ **मो. ९८८१७७३७४१**

## वाढदिवस

आजच्या दिवसाची आठवण कोणाला?
तिच्या मनात अवेळी फुललेल्या मोरपिसाऱ्याला!
आजचा दिवस विशेष कोणासाठी?
त्या कमलदलांवर थरथरणाऱ्या दवबिंदूसाठी!
आजची भिरभिरणारी नजर कोणासाठी?
नजरा चुकवून डोळ्यांत बुडालेल्या तिच्यासाठी
आजची ही अनोखी हुरहुर कोणासाठी?
प्रणय न् प्रेमाच्या दोन धुंद काठांसाठी!!

**माधव पुराणिक,पुणे**
७९/१४ **मो. ९६२३४४२२२२**

शब्दचित्र

# गणेश

गणेश एक साधासुधा भोळसट मुलगा, बुद्धी यथातथाच, त्यामुळे शिक्षणाशी त्याचे फारसे कधी जमले नाही. त्याचे सहाध्यायी आजूबाजूचे इतर लोक त्याला सतत चिडवायचे, हिणवायचे, 'तुला काही अक्कल नाही, तुला काही येत नाही. तू काही कामाचा नाहीस' वगैरे वगैरे. दिसायला तसा तो चारचौघांसारखाच, मग असं का? विचार करता एक एक गोष्ट त्याला उलगडत गेली.

त्याचे डोळे अगदी बारीक. आडव्या दोन चिराच जणू. त्याचे मामा त्याला चष्मा लागला तेव्हा म्हणाले, ''आज आम्हाला समजले, तुला डोळे आहेत म्हणून. एरव्ही तू मिचमिचा आहेस. कानांचा उपयोग चष्मा अडकवायचा स्टँड म्हणून नक्की होतो. एरव्ही गाढवासारखे लांब कान आहेत ह्याचे, गाढव कुठला'' हेच ऐकायची सवय. अनैच्छिक कामांपैकी महत्त्वाचे काम म्हणजे श्वासोश्वास. त्यासाठी बुद्धी लागत नाही किंवा वेगळे काही करावे लागत नाही. नाकामध्ये वास किंवा गंध घेण्यासाठी घ्राणेंद्रिय असतात हे फक्त वाचलेले. त्याला कधीही कुठलाही वास येत नसे. त्यामुळे एका नैसर्गिक आनंदाला तो मुके. शिवाय ''तुम्ही इथेच आहात म्हणून मी गॅसवर दूध ठेऊन गेले, ते ऊतू गेले तरी तुम्हाला अजिबात वास कसा आला नाही?'' असं ऐकून घ्यावे लागे. परंतु घाणवाससुद्धा आपल्याला समजत नाही हे एका अर्थानं बरंच आहे असा सकारात्मक विचार तो करी. तोंडाचे दोन उपयोग त्याला ज्ञात होते. खाणे आणि बोलणे. समोर येईल ते खाण्याशिवाय त्याच्याकडे अन्य पर्याय नव्हता. हे काम तो इमाने इतबारे करायचा, कारण तेवढेच त्याला जमायचे. ''तुला गुळाची चव कशी कळणार?'' असंच सर्वजण त्याला विचारीत. चव समजण्याचा मार्ग बंद. तरी, सकाळची भाजी संध्याकाळी वाढताना त्याची पत्नी आधी वास घेऊन पाहायची, वास येत नसेल तरच वाढायची. कारण आपण वाढली तर तो नक्की खाईल अशी तिला खात्री होती. तिच्यापरिने ती गणेशची काळजी घ्यायची पण ती कुठे कुठे पुरी पडणार? तोंडाचा दुसरा उपयोग बोलणे. घराबाहेर पडल्यानंतर एखाद्या निवांतक्षणी तो समुद्राशी, पर्वताशी किंवा झाडांशी संवाद साधायचा. विविध विषयांवरील आपली मते तो त्यांना पटवून देई. समजावून सांगे. पुन्हा चारचौघात आल्यावर तो गप्प. घरी परतल्यावर काही बोलण्यासाठी तोंड उघडण्याचे धैर्य त्याचेजवळ नव्हते चुकुनमाकून धीर करून तो काही बोललाच तर कोणी तिकडे लक्ष देत नसे.

हे सगळे अवयव इतरांप्रमाणेच त्याच्या चेहऱ्यावर विराजमान होते. त्यावर मस्तक होते पण ते टोपी घालण्यापुरतेच. त्याच्या डोक्यात कधी काही शिरतच नसे. त्याच्या मंद बुद्धिची दया येऊन एका शिक्षकाने त्याची खास शिकवणी घ्यायची ठरवले. त्याला प्रत्येक गोष्ट चार-चार वेळा सांगावी लागे. तेव्हा कुठे स्वल्प प्रमाणात काही समजे. ते शिक्षक वैतागायचे पण त्यांनी चिकाटी सोडली नाही. त्यांच्या अथक प्रयत्नामुळे गणेश मॅट्रिकची परीक्षा काठावर का होईना पास झाला. कितव्या प्रयत्नात? हा प्रश्न इथे गैर लागू आहे. सारे अवयव असूनसुद्धा आपण कशाचा उपयोग करू शकत नाही याची त्याला खंत वाटे. एकदा त्याने देवाकडे तक्रार केली, ''सर्वकाही देऊनही तू मला असं अर्धवट का ठेवलेस? आता मला तू अजून काहीतरी दे.'' देव उत्तरला, ''अरे माझं नाव सुद्धा मी तुला दिलंय अजून काय देऊ? जे जे जवळ आहे, त्याचा योग्य उपयोग कर.'' तेव्हापासून गणेशच्या विचाराची दिशा पूर्णपणे बदलली आणि तो सुखी-समाधानी झाला.

**अरुण तुळजापूरकर, (पुणे)**
**मो. ९८९०२२६१५४**

## समाधान

आयुष्यात मनासारखे
सारे काही मिळते का?
मिळते असे मानले तरी
समाधान त्यात वाटते का?

शिक्षण नोकरी, लग्न संतती
पाहिजे तसे घडते का?
घडते असे मानले तरी
समाधान त्यात वाटते का?

जन्म, मृत्यू, पालक, धन
आपल्या हाती असते का?
आपल्या हाती मानले तरी
समाधान त्यात वाटते का?

भोग, नियती, देव, नशीब
हे सर्व खरे असते का?
सर्व खरे मानले तरी
समाधान त्यात वाटते का?

संत, साधू अन् सत्पुरुष
करिती उपदेश सकलांना
उपदेश त्यांचा मानला तर
समाधान मिळेलच, हे माना

**अरुण भट, बदलापूर (पूर्व)**
**९/१४ मो. ९६०४३८३६०७**

पर्यटन

# भावनाशून्य प्रामाणिकपणा - एक अनुभव

गेली दहा वर्षे लग्नानंतर अमेरिकेत स्थायिक झालेल्या माझ्या मुलीला भेटण्यास मी एप्रिल २०१४ मध्ये अमेरिकेला गेलो. माझा मित्र व त्याचा मित्र परिवार मित्राच्या मुलाच्या पदवीदान समारंभासाठी रॉचेस्टर येथे येणार होतो. पदवीदान समारंभानंतर त्यांचा मुलगा प्रथमेश नायगरा बोस्टन अटलांटिक सिटी, फिडाडेल्फीया, न्यूयॉर्क, वॉशिंग्टन अशी इस्ट कोस्टची ट्रीप गाडीने करणार होतो. ठरल्याप्रमाणे मी प्रथमेश परिवाराला रोचेस्टर येथे सामील झालो. ट्रीपमध्ये आम्ही न्यूयॉर्क पाहावयास आलो असता आमचा मुक्काम न्यू जर्सी येथे एका इंडियन हॉटेलमध्ये होता. न्यूयॉर्क शहर आम्ही मेट्रो, टॅक्सी व पायी फिरावयाचे ठरवले होते. त्याप्रमाणे आम्ही मेट्रोने जर्सीजवळील स्टेशनहून वर्ल्ड ट्रेड सेंटरपर्यंत प्रवास केला. हॉटेलमधून निघताना माझ्याजवळ मुलीने दिलेले १५०० डॉलर मी सोबत घेतले होते. त्या नोटा मी कागदाच्या घडीत घालून जीनपॅंटच्या पुढच्या खिशात ठेवल्या. प्रवासात मी अधूनमधून पैसे सुरक्षित आहेत याची खातरजमा करीत होतोच.

आम्ही वर्ल्ड ट्रेड सेंटर स्टेशनवर उतरल्यानंतर आम्हाला ९/११ मेमोरिअल पाहण्यासाठी पायीच जावयाचे होते त्याप्रमाणे आम्ही जीपीएस् प्रणालीचा आधार घेत पायीच निघालो. अमेरिकेत प्रथमच एवढी गर्दी पाहत होतो. गगनचुंबी इमारती, भव्य रस्ते आणि सगळा झगमगाट पाहण्यात दंग होतो. त्या गर्दीत आम्ही मागे पुढे झालो. अचानक माझा मोबाईल वाजला. मी मोबाईल काढून कानाशी लावला. प्रथमेश मला मी कोठे आहे ह्याची विचारणा करत होता. मी त्याच्या जवळच होतो. फोन बंद करून मी खिशात ठेवला. पुन्हा आम्ही एकत्र येऊन मार्गक्रमण करू लागलो. थोड्याच अवधीत माझ्या लक्षात आले की, खिशात ठेवलेल्या कागदाच्या घडीमध्ये १५०० डॉलर होते, तो कागद सापडेना. मग माझ्या लक्षात आले की आपण जेव्हा मोबाईल खिशातून काढला तेव्हा ती कागदाची घडी पडली याची खात्रीच झाली. ज्या ठिकाणी मी मोबाईल काढला तेथील जागेवर जाऊन पाहिले. सर्वजण शोधाशोध करू लागले. तिथे काहीच सापडले नाही. सर्वजण निराश झालो. कोणाला काही विचारण्याची सोय नव्हती. पैसे हॉटेलमध्ये असावेत असे सर्वांना सांगून ९/११ मेमोरिअलच्या दिशेने मार्गस्थ झालो. अवघी पाच मिनिटे झाली असतील, प्रथमेशचा फोन वाजला. काहीतरी हरविलेल्या वस्तूबद्दल तो बोलत होता. त्याने झटकन फोन माझ्या हातात दिला आणि म्हणाला तुमच्या जावयाशी बोला.

भूपेंद्र माझा जावई बोलत होता, "Pappa have you dropped something in New York?" असे विचारल्यावर मला धक्काच बसला व आश्चर्यही वाटले. मी ताबडतोब होकारार्थी कबुली दिली. माझे पैसे ठेवलेल्या कागदाची घडी पडल्याचे सांगितले. १५०० डॉलर आहेत. मला प्रश्न पडला आहे की माझं काही हरवलं आहे ही बातमी सॅनहोजे कॅलिफोर्निया येथे कशी काय कळाली? मला न्यूयॉर्कची फारशी माहिती नसल्यामुळे पुढील बोलणे प्रथमेशशी झाले. नंतर खुलासा झाला की, पैसे ठेवलेली कागदाची घडी एका अमेरिकन मुलीला सापडली होती. ज्या कागदात पैसे ठेवले होते त्या कागदावर नोंदविलेल्या फोनवर संपर्क साधला आणि त्या अमेरिकन मुलीने जावयाला विचारले. "Who is Sudhir Pawar?" मग जावयाने सांगितले ते माझे सासरे आहेत आणि सध्या न्यूयॉर्क पाहत आहेत. तेव्हा त्या मुलीने सांगितले त्यांची काहीतरी वस्तू मला सापडली आहे आणि मला ती परत करावयाची आहे. तिचा फोन क्रमांक घेऊन प्रथमेशने तिच्याशी संपर्क साधला आणि काय हरवले ते सांगितले तिला बहुतेक खात्री पटली. तिने तिच्या ऑफीसचा पत्ता दिला प्रथमेशने GPS द्वारे तिच्या ऑफीसच्या पत्याच्या नकाशाप्रमाणे आम्ही पोहोचलो. चालता चालता तिच्याशी काय संभाषण करावयाचे? तिला धन्यवाद कोणत्या शब्दात द्यावयाचे? तिला काय छानसे बक्षिस द्यावयाचे, तिला लंचला आमंत्रित करावयाचे का? असे अनेक प्रश्न माझ्या मनात येऊ लागले. तिच्याशी इंग्रजीतून काय बोलावयाचे त्या शब्दांची जुळवाजुळव चालू झाली.

अखेर आम्ही त्या इमारतीजवळ आल्यावर प्रथमेशने त्या अनामिकेला फोन केला. तिने सांगितले मी खाली येतेच. त्याप्रमाणे ती ऑफीसलगतच्या फुटपाथवर आली. मग तिने पुन्हा प्रथमेशला फोन लावला व आमच्या लक्षात आले की एक मुलगी हातवारे करीत बोलत होती. आमची नजरानजर झाली. तेव्हा लक्षात आले की आम्ही रस्त्याच्या विरुद्ध बाजूकडील फुटपाथवर उभे आहोत. तिने धावत शिताफीने रस्ता क्रॉस केला आणि आमच्या पुढे येऊन म्हणाली Sudhir Pawar? मी होकार दिला. तिने एक कोरं पाकीट माझ्या हातात दिले आणि OK म्हणून स्वत:ची ओळख न देता क्रॉस करून निघून गेली.

नंतर मी ते पाकिट उघडले त्यात १५०० डॉलर (नोटा) व्यवस्थित होत्या. तो कागद म्हणजे सिएटल प्रवासाचे E तिकीट होते. त्यात माझी सर्व माहिती पण दूरध्वनी संपर्क क्रमांक जावयाचा होता आणि तो प्रवास मी आधीच्या आठवड्यात पूर्ण केला होता. त्या E तिकीटच्या प्रिंटमुळे पैसे माझ्यापर्यंत पोहोचले. त्या मुलीच्या निरपेक्ष प्रामाणिकपणाचे मन:पूर्वक आभार आहेतच. पण मला वाटतं की अशा शूष्क मानवीय व्यवहारामुळे आमच्यासारख्या सिनियर सिटीझनचं मन मात्र अमेरिकेत फार काळ रमत नाही हेच खरे.

**सुधीर महादेव पवार, पुणे**
**मो. ९५५२५४७४८७**

## Annual General Meeting held on 27th August 2014 at Pune - Snap Shots



**Shri. S. B. Satwe from Nashik being felicitated at the hands of President with "Late Shri.Vasudeo V. Gandhe & Smt.Umabai V. Gandhe Puraskar" Mrs.Mangalatai S. Satwe looks on**



**Shri. M. T. Deshpande from Nanded being felicitated at the hands of President with "Late Shri.Vasudeo V. Gandhe & Smt.Umabai V. Gandhe Puraskar"**



**Shri. Raghuram Shetty, Dy.G.M.,Zone-I, Pune Z.O. addressing the pensioners during the Bank's Pensioners' Meet held during the Annual General Meeting held on 27th August 2014 at Harshal Hall, Pune**



**Shri.Jayant Deb Majumdar, Dy.G.M.,Zone-II, Pune Z.O. addressing the pensioners during the Bank's Pensioners' Meet held during the Annual General Meeting held on 27th August 2014 at Harshal Hall, Pune**

OCTOBER - 2014 SAMVAD

**Regd. under RNI No. MAHBIL/2008/25425 & Declaration No. PHM/SR/63/VIII/2008 Dated 12/5/2008**
**SSPO Pune under Postal Concession Register No. PCW/151/2014-2016**
**Licence to Post without Prepayment No.WPP - 22 at Market Yard P.S.O. on 25th of each Month and published on 25th of the month**

## आशा

हात रूंदावला होता, तेव्हा कमळ कोमेजलं होतं
आता हात हिरमुसल्यावर कमळ डवरून आलंय
आहे ना हा सगळा काळाचा खेळ?
कसा लावायचा या सगळ्या घटनांचा मेळ?
इतकं सगळं होऊनही गरीबीत पडलाय का काही
फरक?
तो बापडा आला दिवस ढकलतोय अगदी सहज
त्याच्या सहनशीलतेचं रहस्य दडलयं भाबड्या
आशावादात
केव्हातरी मजबूत हातात येईल ना फुललेलं कमळ
मग थारा नसेल हेवेदावे आणि कटकारस्थानांना
सर्वत्र असेल भाईचारा सुख शांति आणि सुबत्ता
मग बनेल ना लवकरच आपला भारत एक महासत्ता!

७३/१४

अपर्णा सावंत, पुणे
मो. ९५४५०८३९९९

## शब्द

संगतीने अक्षरांच्या शब्दा येई रूप
बालपणी निरागस त्याचे बोबडे स्वरूप
रांगताना नयनी सृष्टी निसर्ग दृष्टीरूप
नजरेत निरखूनी घेई जग हे गुपचुप.. १
गिरविता शब्द शोधती ज्ञानभंडार
शब्द येई यौवनी, रूप तयाचे सुंदर
रुसती शब्द, येई विरहाची लहर
प्रेम-बंधात राही नाते निरंतर.. २
वदती शब्द मैत्री अन् दुष्मनीही
लहान जरी वा मोठे, असती महान ही
काव्यात शोभती, कथा-कादंबरीतही
व्यक्त होती कसेही, लपती अर्थातही.. ३
कठीण ते शब्द, साधे सोपेच ही
असती जरी मधुर, बोचती काट्यापरीही
माझेच शब्द, बोलणे उच्चार माझेच ही
मुकेपणी कुणा-कुणाच्या वसती अंतरीही.. ४

७४/१४

सतीश केतकर, कल्याण
मो. ९७६९५६२३१०

सूचना : १) या मासिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांतील मतांशी संपादकमंडळ सहमत असेलच असे नाही. तसेच जाहिरातीतील मजकुराची सत्यासत्यता सभासदांनी स्वत: पडताळून घ्यावी. त्याबाबत असोसिएशन वा 'संवाद' चे संपादक मंडळ जबाबदार असणार नाही.
२) असोसिएशनचे कार्यालय, सोमवार ते शुक्रवार, संध्याकाळी ६ ते ७.३० या वेळातच उघडे असते. याची कृपया नोंद घ्यावी. संपर्क दूरध्वनी क्र. (०२०) २४३३२१४१

**Thane Office Address** : A/5 Swami Siddharth CHS Ltd., S V Road, Naupada, Thane 400 602. Tel. No : 25446837
**Timings** : On Tuesday & Friday between 4 pm to 6 pm.

**Printed Matter**

To,

**If Undelivered Please Return to :**
**STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATION, (MUMBAI CIRCLE), PUNE**
**Anubandh, Building No. B-2, 4th Floor, Block No.16, Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune - 411030. Phone : 24332141**

**Publisher** – Shri. Ramchandra Narayan Lalingkar, Secretary, State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune has printed this magazine in the Printing Press owned by **Printer** – Shri.Chandrashekhar Digambar Joshi, Director, Shree J Printers Pvt.Ltd., at 1416 Sadashiv Peth, Datta Kuti, Pune – 411030 on behalf of **Owner** – State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune, at "Anubandh", Bldg.No.B2, Block No.16,Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune – 411030. **Editor** – Shri. Krantisen Ramchandra Athawale – address as above.